पुढारी



गारगोटी : भात पीक स्पर्धेत राज्यात तृतीय क्रमांक मिळविणाऱ्या चंद्रकांत चव्हाण यांचा गौरव करताना राज्यपाल विद्यासागर राव. सोबत पालकमंत्री चंद्रकांत पाटील, मंत्री गिरीश बापट आदी.

# भातपीक स्पर्धेमध्ये चव्हाण राज्यात तृतीय

**गारगोटी : प्रतिनीधी**

सन २०१६-१७ मध्ये घेण्यात आलेल्या भात पीक स्पर्धेत राज्यस्तरावर गारगोटीच्या रामचंद्र शामराव चव्हाण यांनी तृतीय क्रमांक पटकाविला. हेक्टरी ९८ क्विंटल १५ किलो भात उत्पादन घेतले होते. त्यांचा नुकताच महाराष्ट्राचे राज्यपाल विद्यासागर राव यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

चंद्रकांत चव्हाण यांना शेतीची आवड असल्याने शेतीलाच प्राधान्य देऊन कुटुंबाच्या मालकीचे असणाऱ्या १० एकर शेतीत भात, ऊस, केळी, भुईमूग अशा वेगवेगळ्या पिकांना सातत्याने प्राधान्य दिले आहे. दर्जेदार पीक व उत्पन्नवाढ याबाबत सातत्याने जागृत राहून ते वेगवेगळे प्रयोग करत आहेत.

यावेळी चव्हाण यांनी भात पीकही शेतकऱ्यांना फायदेशीर ठरणारे असून योग्य मार्गदर्शन, बारकाईने लक्ष देऊन मशागत आवश्यक आहे. कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांनी शेतकऱ्याला प्रत्यक्ष बांधावर जाऊन केलेले मार्गदर्शन, माती परीक्षण व त्यानुसार पिकाचे केलेले नियोजन आणि शेतकऱ्यांचे नियोजनबद्ध कष्ट यामुळे पिकाच्या रूपाने मातीतूनही सोने उगवते, असा संदेश शेतकऱ्यांना दिला.

पुढारी



# ...तर रंकाळा होईल कोल्हापूरचा नेकलेस!

**हैदराबाद येथील हुसेनसागर तलावाच्या धर्तीवर कोल्हापूरचे ऐतिहासिक वैभव असणाऱ्या रंकाळा तलावाचा विकास शक्य आहे, असा विश्वास राज्यपाल सी. विद्यासागर राव यांनी व्यक्त केला आहे. हुसेन सागरच्या धर्तीवर रंकाळ्याचे सुशोभीकरण झाल्यास रंकाळा हा कोल्हापूरचा नेकलेस होईल. राज्यपाल राव यांच्या आश्वासक विधानानंतर हुसेनसागर तलावाचा घेतलेला थोडक्यात आढावा...**

हुसेनसागर तलाव हा नेकलेसच्या आकाराचा आहे. या तलावास भेट दिल्यानंतर हैदराबादच्या गळ्यातील (नेकलेस) कंठमणीसारखेच या तलावाचे विहंगम दृश्य अनुभण्यास मिळते. इब्राहिम क्यू कुतूब शहा यांनी १५६३ साली या तलावाची निर्मिती केली आहे. मुसी नदी आणि उपनद्यांच्या परिसरात सुमारे ५.७ चौरस किलोमीटर भागात तलाव विस्तारला आहे. या तलावाची खोली सुमारे १० फूट आहे. तलावाच्या मध्यभागी असलेल्या खडकाळ भागाचे १९९२ साली सुशोभीकरण करण्यात आले आहे. या भागात गौतम बुद्धांचा भव्य पुतळा उभा करण्यात आला आहे.

## वैशिष्ट्यपूर्ण रचना

हैदराबाद आणि सिकंदराबाद या जुळ्या शहरांना हा तलाव सामाईक आहे. या तलावामुळेच ही दोन शहरे स्वतंत्र झाली आहेत. हुसेन शहा वाली यांनी या तलावाची रचना वैशिष्ट्यपूर्ण बनवली. त्यामुळे हुसेन यांचे नाव तलावास देण्यात आले आहे. हिमायतसागर आणि उस्मानसागर तलावाची निर्मिती होण्याआधी हुसेनसागर तलावातूनच संपूर्ण हैदराबादला पाण्याचा पुरवठा केला जात होता.

## हर्ट ऑफ द वर्ल्ड

२०१२ रोजी जागतिक पर्यटन दिनाचे औचित्य साधून या तलावास 'हर्ट ऑफ द वर्ल्ड' म्हणून गौरविण्यात आले. या तलावाचा जागतिक वारसास्थळात समावेश करण्यात आला आहे. जगभरात काही मोजक्याच तलावांची 'हर्ट ऑफ द वर्ल्ड'मध्ये नोंद आहे. यामध्ये हुसेनसागरचा समावेश असल्याने जणू प्रेमाचे प्रतीक म्हणूनही लाखो पर्यटक तलावास भेट देतात.

## कृत्रिम तलाव

आंध्र प्रदेशचे तत्कालीन मुख्यमंत्री एन. टी. रामाराव यांनी १९८८ साली या तलावाचे सुशोभीकरण करून हैदराबादच्या सौंदर्यात आणखी भर घातली. तत्पूर्वी, १९४६ साली तलावाकडे जाणाऱ्या रस्त्यांच्या रुंदीकरणासह तलावाच्या सुशोभीकरणाची अन्य कामे करण्यात आली होती. मुसी नदी आणि उपनद्यांद्वारे कालव्यातून या तलावास पाणीपुरवठा केला जातो. त्यामुळे हा एकप्रकारे कृत्रिम तलाव आहे.

## मध्यभागी गौतम बुद्धांचा भव्य पुतळा

तलावाच्या मध्यभागी जिब्राल्टर खाडीत भगवान गौतम बुद्धांचा १८ मीटर उंचीचा भव्य पुतळा उभा करण्यात आला आहे. सुमारे दोनशे शिल्पकारांनी दोन वर्षात या पुतळ्याची निर्मिती केली. १९९२ साली हुसेनसागर तलावाच्या मध्यभागी हा पुतळा उभा करण्यात आला. यामुळे या तलावाच्या सौंदर्यात नव्याने भर पडली आहे. या तलावाच्या काठावरच १९२० साली हुसेनसागर औष्णिक ऊर्जा केंद्र सुरू करण्यात आले. हैदराबाद आणि सिकंदराबाद या जुळ्या शहरांना केंद्रातूनच विद्युतपुरवठा केला जातो.

## सौंदर्यस्थळे

तलावाच्या परिसरात पर्यटकांसाठी विविध सौंदर्यस्थळे विकसित करण्यात आली आहेत. संगीत कारंजे, नौकानयन, मल्टिप्लेक्स थिएटर, स्नो वर्ल्ड, ऑडिटोरिअमच्या विशेष सुविधा आहेत. १९७१ च्या भारत-पाक युद्धातील रणगाडे, बिर्ला मंदिर, लुंबिनी पार्क, एन.टी.आर. गार्डन आदी पर्यटनस्थळांचा या ठिकाणी विकास करण्यात आला आहे.

पुढारी

# ग्रंथ आमचे साथी...विश्व आमच्या हाती

## दीक्षान्त समारंभाच्या पार्श्वभूमीवर ग्रंथदिंडी उत्साहात; शेकडो विद्यार्थी-विद्यार्थिनींचा सहभाग

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

ग्रंथ आमचे साथी, विश्व आमच्या हाती... ग्रंथ वाचाल तर कुठेही सुखी राहाल... वाचाल तर वाचाल, अशा आशयाचे फलक घेऊन शेकडो विद्यार्थी ग्रंथदिंडीत सहभागी झाले. शुक्रवारी सकाळी कमला कॉलेजपासून ग्रंथदिंडीला सुरुवात झाली. विविध महाविद्यालयांचे विद्यार्थी, विद्यार्थिनी, एन. सी. सी., राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक सहभागी झाले होते. शिवाजी विद्यापीठाच्या आवारात पथनाट्यांनी दिंडीची सांगता करण्यात आली.

कमला कॉलेज येथे शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे व ताराराणी विद्यापीठाचे कार्यकारी अध्यक्ष डॉ. क्रांतीकुमार पाटील यांच्या हस्ते ग्रंथ दिंडीचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी प्र. कुलगुरू डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, डॉ. डी. आर मोरे, महेश काकडे, राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. डी. के. गायकवाड, व्ही. टी. पाटील, डॉ. नमिता खोत, अमित कुलकर्णी, डॉ. पी. डी. राऊत, डॉ. आर. जी. कोरबू, डॉ. डी. बी. सुतार यांच्यासह बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्त्रोत केंद्र व माहितीशास्त्र विभागाचे कर्मचारी उपस्थित होते.

राजारामपुरी पहिली गल्ली, माऊली पुतळा चौक, सायबर चौक, दूरशिक्षण केंद्रमार्गे दिंडी विद्यापीठात आली. दिंडीच्या अग्रभागी फुलांनी सजवलेल्या पालखींमध्ये ग्रंथ ठेवण्यात आले होते. वाचनसंस्कृतीबाबत प्रबोधन करणारे फलकांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी शहरवासीयांचे लक्ष वेधले. जय जवान, जय किसान, जय शिवाजी, जय भवानी अशा घोषणांनी वातावरणात स्फुलिंग संचारले. पुलवामातील शहिदांना यावेळी श्रद्धांजली वाहण्यात आली.





**कोल्हापूर : कमला कॉलेज येथे ग्रंथ पूजनाने दिंडीला सुरुवात झाली. फुलांची आरास केलेल्या पालखीतील ग्रंथाचे पूजन करताना शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे. सोबत डॉ. डी. आर. मोरे, डॉ. नमिता खोत, महेश काकडे, डॉ. ए. एम. गुरव आदी. तर दुसऱ्या छायाचित्रात विद्यापीठ आवारात पथनाट्यांच्या सादरीकरणाने दिंडीचा समारोप करण्यात आला. पथनाट्य सादर करताना कमला कॉलेजच्या विद्यार्थिनी. (छाया : पप्पू अत्तार)**




**कोल्हापूर : कमला कॉलेज ते शिवाजी विद्यापीठ मार्गावर काढण्यात आलेल्या ग्रंथदिंडीत सहभागी विद्यार्थिनी.**

### लक्षवेधी फलक

माणसाची चौथी मूलभूत गरज म्हणजे पुस्तक, ज्ञान म्हणजे आत्मतत्त्वांचा बोध होणे होय, ग्रंथ आमच्या हाती... विश्व आमच्या हाती, वाचन बुद्धीचे खाद्य आहे, पुस्तक म्हणजे मन निर्मळ करणारा साबण अशा आशयाचे फलक लक्षवेधी ठरले.

### ग्रंथ प्रदर्शनाला प्रतिसाद

परीक्षा भवन समोरील जागेत ग्रंथप्रदर्शनाचे स्टॉल मांडण्यात आले आहेत. दोन दिवस चालणाऱ्या प्रदर्शनात शिवाजी विद्यापीठातील दुर्मीळ ग्रंथ, स्पर्धा परीक्षेची पुस्तके, कायदा, इतिहास, साहित्य क्षेत्रातील ग्रंथांचा समावेश आहे. कौशल्य व उद्योजकता विकास विभागाच्या खाद्य स्टॉलवरही गर्दी होती.

### पथनाट्यांतून जनजागृती

ग्रंथदिंडीत सहभागी विद्यार्थ्यांनी पथनाट्यांद्वारे जनजागृती केली. कमला कॉलेजने 'स्त्री दास्यातून तुझी सुटका', शहाजी महाविद्यालयाने 'क्षयरोग एक भयान वास्तव' या विषयांवर पथनाट्य सादर केले. तर शाहू कॉलेजचे विद्यार्थी झांजपथक घेऊन सहभागी झाले होते.

पुढारी



कोल्हापूर : राज्यपाल सी. विद्यासागर राव यांनी शुक्रवारी करवीरनिवासिनी श्री अंबाबाईदेवीचे सहकुटुंब दर्शन घेतले. सोबत पश्‍चिम महाराष्ट्र देवस्थान समितीचे अध्यक्ष महेश जाधव, जिल्हाधिकारी दौलत देसाई. (छाया : पप्पू अत्तार)

# राज्यपालांनी घेतले अंबाबाईचे दर्शन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

राज्यपाल सी. विद्यासागर राव यांनी शुक्रवारी सहकुटुंब करवीर निवासिनी श्री अंबाबाईचे दर्शन घेतले. मातृलिंगाचे दर्शन घेत त्यांनी गाभार्‍याभोवती प्रदक्षिणाही घातली.

राज्यपाल राव शुक्रवारी कोल्हापूर दौर्‍यावर आले होते. सकाळी साडे दहा वाजता त्यांचे अंबाबाई मंदिरात आगमन झाले. पश्‍चिम महाराष्ट्र देवस्थान समितीचे अध्यक्ष महेश जाधव यांनी त्यांचे स्वागत केले. देवस्थान समिती व श्रीपूजकांच्या वतीने त्यांचा अंबाबाईची मूर्ती, शाल, श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. देवस्थान समितीचे अध्यक्ष जाधव यांनी करवीर निवासिनी श्री अंबाबाई मंदिराचा ऐतिहासिक, धार्मिक वारसा, वैशिष्ट्ये यांची माहिती देऊन दररोज सुमारे ५० हजार भाविक दर्शन घेत असल्याचे सांगितले.

यावेळी राज्यपालांच्या पत्नी सौ. विनोधा राव, जिल्हाधिकारी दौलत देसाई, मुख्य कार्यकारी अधिकारी अमन मित्तल, जिल्हा पोलिस प्रमुख डॉ. अभिनव देशमुख, भाजपचे जिल्हाध्यक्ष संदीप देसाई, सचिव विजय पोवार, देवस्थान समितीचे सदस्य शिवाजी जाधव, संगीता खाडे, व्यवस्थापक धनाजी जाधव, पोलिस उपअधीक्षक आर.आर. पाटील, डॉ. प्रशांत अमृतकर, निवासी उपजिल्हाधिकारी संजय शिंदे, तहसीलदार सचिन गिरी, सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी अपर्णा मोरे, गटविकास अधिकारी सचिन घाडगे आदी उपस्थित होते.

# राज्यपालांचे विमानतळावर स्वागत

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

राज्यपाल सी. विद्यासागर राव यांचे शुक्रवारी कोल्हापूर विमानतळावर स्वागत करण्यात आले. एक दिवसाच्या कोल्हापूर दौऱ्यावर सकाळी साडेनऊ वाजता त्यांचे विशेष हेलिकॉप्टरने आगमन झाले. यावेळी त्यांच्या पत्नी सौ. विनोधा राव उपस्थित होत्या.

विमानतळावर महापौर सौ. सरिता मोरे, पालकमंत्री चंद्रकांत पाटील, दैनिक 'पुढारी'चे व्यवस्थापकीय संपादक व उर्वरित महाराष्ट्र वैधानिक विकास मंडळाचे अध्यक्ष डॉ. योगेश जाधव, शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे आदींनी पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत केले. पोलिस दलाच्या वतीने त्यांना मानवंदना देण्यात आली.

यावेळी जिल्हाधिकारी दौलत देसाई, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अमन मित्तल, पोलिस अधीक्षक डॉ. अभिनव देशमुख, निवासी उपजिल्हाधिकारी संजय शिंदे, सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी अपर्णा मोरे-धुमाळ आदी उपस्थित होते.



**कोल्हापूर : राज्यपाल सी. विद्यासागर राव यांचे कोल्हापूर विमानतळावर स्वागत करताना दैनिक 'पुढारी'चे व्यवस्थापकीय संपादक व उर्वरित महाराष्ट्र वैधानिक विकास मंडळाचे अध्यक्ष डॉ. योगेश जाधव. यावेळी उपस्थित पालकमंत्री चंद्रकांत पाटील. (छाया : पप्पू अत्तार)**

पुढारी



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासन केंद्र इमारतीची पायाभरणी राज्यपाल सी. विद्यासागर राव यांच्या हस्ते, पालकमंत्री चंद्रकांत पाटील, कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, दैनिक 'पुढारी'चे मुख्य संपादक डॉ. प्रतापसिंह जाधव, दैनिक 'पुढारी'चे व्यवस्थापकीय संपादक व उर्वरित महाराष्ट्र वैधानिक विकास मंडळाचे अध्यक्ष डॉ. योगेश जाधव यांच्या प्रमुख उपस्थितीत झाली. यावेळी डावीकडून उपस्थित सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता संजय सोनवणे, अधीक्षक अभियंता संभाजी माने, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, जिल्हाधिकारी दौलत देसाई, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अमन मित्तल आदी. (छाया : पप्पू अत्तार)

# डॉ. ग. गो. जाधव अध्यासन केंद्र इमारतीची राज्यपाल राव यांच्या हस्ते पायाभरणी

## निधी कमी पडू देणार नाही : पालकमंत्री; देशातील पत्रकारितेचे पहिले अध्यासन : कुलगुरू

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासन केंद्र इमारतीची पायाभरणी राज्यपाल सी. विद्यासागर राव यांच्या हस्ते शुक्रवारी झाली. या अध्यासनाला निधी कमी पडू देणार नाही, अशी ग्वाही राज्याचे महसूलमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी यावेळी दिली.

शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, दैनिक 'पुढारी'चे मुख्य संपादक डॉ. प्रतापसिंह जाधव, दैनिक 'पुढारी'चे व्यवस्थापकीय संपादक व उर्वरित महाराष्ट्र वैधानिक विकास मंडळाचे अध्यक्ष डॉ. योगेश जाधव यांच्या उपस्थितीत हा शानदार सोहळा झाला.

दै. 'पुढारी'चे संस्थापक-संपादक पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव यांच्या नावाने शिवाजी विद्यापीठात सुरू झालेल्या या अध्यासनाच्या केंद्राची अद्ययावत इमारत उभारण्यात येणार आहे. या इमारतीची पायाभरणी राज्यपाल सी. विद्यासागर राव यांच्या हस्ते आज झाली. अध्यासनाच्या इमारतीकरिता १ कोटी रुपयांचा निधी यापूर्वीच उपलब्ध झाला आहे. उर्वरित कामांसाठी ४ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला जाणार आहे. या केंद्रासाठी निधी कमी पडू देणार नाही, असेही पालकमंत्री पाटील यांनी यावेळी स्पष्ट केले.

प्रारंभी डॉ. प्रतापसिंह जाधव यांनी राज्यपाल सी. विद्यासागर राव यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. कुलगुरू डॉ. शिंदे यांनी, हे देशातील पहिले अध्यासन असल्याचे सांगत त्याचे महत्त्व आणि त्याबाबत सुरू असलेली कार्यवाही याबाबतची राज्यपालांना माहिती दिली. पत्रकारितेच्या क्षेत्रातील हे देशातील पहिलेच अध्यासन असल्याबद्दल राव यांनी समाधान व्यक्त केले. मान्यवरांच्या उपस्थितीत पायाभरणी करण्यात आली. यानंतर कोनशिलेचे अनावरण झाले. यावेळी पहिल्या टप्प्यातील सव्वा कोटी रुपयांच्या कामाचा प्रारंभ करण्यात आला.

या कार्यक्रमाला प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, जिल्हाधिकारी दौलत देसाई, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अमन मित्तल, विद्यापीठाचे वित्त व लेखा अधिकारी विलास पाटील, वृत्तपत्रविद्या व जनसंवाद विभागाच्या प्रमुख डॉ. निशा मुडे-पवार, अध्यासनाचे समन्वयक डॉ. रत्नाकर पंडित, उपकुलसचिव (स्थापत्य) गिरीश कुलकर्णी, आर्किटेक्ट जीवन बोडके, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता संभाजी माने, कार्यकारी अभियंता संजय सोनवणे, सहायक कार्यकारी अभियंता रोहित तोंदले, सहायक कार्यकारी अभियंता विलास पाटील, सहायक विजय वडर, सिद्धांत कन्स्ट्रक्शनचे संजय कोले आदींसह विद्यापीठाच्या विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.

### राज्यातील सर्वात मोठे माध्यम संकुल साकारणार

पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासन केंद्राची आकर्षक इमारत उभारली जाणार आहे. या इमारतीच्या दोन्ही बाजूला जर्नालिझम आणि मास कम्युनिकेशन विभागाच्या इमारती होणार आहेत. या दोन्ही विभागांतील विद्यार्थ्यांना विविध सुविधा या अध्यासन केंद्राच्या माध्यमातून उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. यामुळे राज्यातील विद्यापीठ परिसरात कार्यरत होणारे हे सर्वात मोठे माध्यम संकुल साकारले जाईल, अशा भावना यावेळी मान्यवरांनी व्यक्त केल्या.

पुढारी

# विद्यापीठात जल्लोष

(पान १ वरून) पदवी प्रमाणपत्र वाटप बंद करण्यात आले. त्यानंतर मुख्य दीक्षांत समारंभ संपल्यानंतर दुपारी पुन्हा पदवी प्रमाणपत्र वाटप सुरू करण्यात आले. यावेळी प्रत्येक स्टॉलवर पदवी घेण्यासाठी विद्यार्थ्यांच्या रांगा लागल्या होत्या.

शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याभोवती व्यावसायिक छायाचित्रकांनी स्टॉल मांडले होते. पदवी प्रमाणपत्र घेतल्यानंतर विद्यापीठ मुख्य इमारतीसमोरील अश्वारूढ छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याजवळ पदवीचा गाऊन घालून छायाचित्र घेण्यासाठी विद्यार्थ्यांची झुंबड उडाली होती. प्रत्येकजण आपापल्या मोबाईलवरही छबी टिपत होता. विद्यार्थ्यांच्या सुविधेसाठी विद्यापीठ परिसरात ठिकठिकाणी माहिती फलक उभारण्यात आले होते. विद्यापीठ प्रशासनाने दुचाकी व चारचाकी पार्किंगची वेगवेगळ्या ठिकाणी स्वतंत्र व्यवस्था केली होती. दीक्षांत समारंभानिमित्त मोठा पोलिस बंदोबस्त होता.

याशिवाय रुग्णवाहिका, अग्निशमन यंत्रणा, पाणी टँकर, सुरक्षा रक्षक तैनात होते. विद्यार्थ्यांनी पदवी घेतल्याचे फोटो सोशल मीडियावर शेअर केले जात होते. विद्यार्थ्यांकडून ग्रुपचा तसेच वैयक्तिक सेल्फी घेऊन तो सोशल मीडियावर अपलोड करण्यात येत होते.

काहींनी कुटूंबातील ज्येष्ठांसोबत, आई-वडिलांसोबत सेल्फी घेत कौटुंबिक सोहळा पार पाडला. महाविद्यालयांना दूर शिक्षण विभागाच्या इमारतीत पदवी प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात येत होते. संबंधित महाविद्यालयाचे प्राचार्य, नियुक्त प्रतिनिधी शुक्रवारी सकाळी ८ वाजल्यापासून याठिकाणी येत होते. कोल्हापूर, सांगली, सातारा या जिल्ह्यांसाठी स्वतंत्र कक्षांद्वारे २० ठिकाणी पदवी वितरण प्रक्रिया सुरू होती.

My Kolhapur Edition
23 Feb, 2019 Page No. 2
Powered by : erelego.com

पुढारी

# विद्यापीठात जल्लोष

**शिवाजी विद्यापीठ पदवी प्रदान सोहळा**



कोल्हापूर : पदवी प्रमाणपत्र मिळताच विद्यार्थ्यांनी असा जल्लोष केला.

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शैक्षणिक कारकिर्दीतील महत्त्वपूर्ण टप्पा असणाऱ्या पदवीचा आनंद...खूप दिवसांनी भेटलेले मित्र-मैत्रिणी...शिक्षक, पालकांच्या आशीर्वादाने नवीन पदवी घेतानाचा जल्लोष...अशा वातावरणाने विद्यापीठाचा परिसर शुक्रवारी फुलून गेला होता.

पदवी देण्याची सुविधा महाविद्यालयांच्या ठिकाणीच उपलब्ध करण्यात आल्याने गतवर्षीच्या तुलनेत यंदा गर्दी कमी जाणवली; परंतु पदवी घेतानाचा विद्यार्थ्यांचा उत्साह कायम होता. शिवाजी महाराजांच्या पुतळ्यासमोर छायाचित्र घेताना विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यांवरील आनंद ओसंडून वाहत होता.

दीक्षान्त समारंभाच्या निमित्ताने मुख्य इमारतीपासून ते लोककला केंद्रापर्यंत आकर्षक मंडप उभारण्यात आला होता. याच आवारात ग्रंथ प्रदर्शनाचीही मांडणी करण्यात आली होती. सकाळपासून विद्यापीठाच्या प्रांगणात विद्यार्थ्यांनी गर्दी होती. केएमटी, रिक्षा व खासगी वाहनांमधून विद्यार्थी दीक्षान्त समारंभ ठिकाणी येत होते. काही जण मित्र-मैत्रिणी यांच्याबरोबर तर काही विद्यार्थी आई-वडील, नातेवाईकांसह पदवी घेण्यासाठी विद्यापीठात आले होते.

विविध विद्याशाखांच्या पदव्या घेण्यासाठी परीक्षा भवन परिसरात २० हून अधिक स्टॉल लावण्यात आले होते. सकाळी साडेसात वाजता पदवी प्रमाणपत्रे विद्यार्थ्यांना वाटण्यास प्रारंभ झाला. याप्रसंगी हजारो विद्यार्थ्यांनी उपस्थित राहून पदवी प्रमाणपत्र घेतले. सकाळी साडेदहा वाजता **पान २ वर**

### २५ हजार विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्रांचे वाटप

शिवाजी विद्यापीठातर्फे यावर्षी एकूण ४८ हजार ५१५ पदवी प्रमाणपत्रे प्रदान केली जाणार आहेत. यापैकी २४ हजार ५१५ विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष पदवी प्रमाणपत्रे वाटप करण्यात आली; तर २३ हजार ६४० प्रमाणपत्रे पोस्टाद्वारे घरपोच पाठविण्यात येणार आहेत. २५८ स्नातकांनी पीएच.डी. पदवी प्राप्त केली आहे. यातील ४० जणांना व्यासपीठावर पदवी प्रदान करण्यात आली.





कोल्हापूर : १) पदवी प्रमाणपत्रे घेताना विद्यार्थ्यांची झालेली गर्दी. २) पदवीसोबत सेल्फी घेताना विद्यार्थी. (छाया : पप्पू अत्तार)

पुढारी

# डॉ. मेत्री

शिंदे म्हणाले, प्रशासकीय कामकाज सुरळीत चालण्यासाठी प्रशिक्षित मनुष्यबळ महत्त्वाचे आहे. त्यासाठी विद्यापीठात स्वतंत्र अ‍ॅकॅडमी फॉर अ‍ॅकॅडेमिक अ‍ॅडमिनिस्ट्रेटर्सची स्थापना करण्यात आली आहे. लवकरच विद्यापीठातील विविध विभागांना आय.एस.ओ. हे आंतरराष्ट्रीय मानांकन प्राप्त होणार आहे. एन.बी.ए. (नॅशनल बोर्ड ऑफ अ‍ॅक्रिडिटेशन) या अभियांत्रिकी उच्चशिक्षण संस्थांचा दर्जा निर्धारित करणाऱ्या शिखर संस्थेच्या पथकाकडूनही विद्यापीठाची पाहणी होणार आहे.

प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला. परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे यांनी पदवी, पदविका व प्रमाणपत्रांच्या यादीचे वाचन केले. आलोक जत्राटकर, धैर्यशील यादव व जयश्री देसाई यांनी सूत्रसंचालन केले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी आभार मानले. प्रारंभी, मान्यवरांचे पसायदानाच्या साथीने दीक्षान्त मिरवणुकीने कार्यक्रमस्थळी आगमन झाले. ज्ञानदंड हाती घेऊन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे यांनी दीक्षान्त मिरवणुकीचे नेतृत्व केले.

# ‘हुसेनसागर’च्या धर्तीवर रंकाळ्याचा विकास करावा

**(पान १ वरून)** यावेळी महापौर सरिता मोरे, जिल्हाधिकारी दौलत देसाई, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अमन मित्तल, पोलिस अधीक्षक डॉ. अभिनव देशमुख, मनपाचे अतिरिक्त आयुक्त श्रीधर पाटणकर, निवासी उपजिल्हाधिकारी संजय शिंदे, पोलिस उपअधीक्षक डॉ. प्रशांत अमृतकर, सहायक आयुक्त मंगेश शिंदे, शहर अभियंता नेत्रदीप सरनोबत, आरोग्य अधिकारी डॉ. दिलीप पाटील, तहसीलदार सचिन गिरी, सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी अपर्णा मोरे, गटविकास अधिकारी सचिन घाडगे आदींसह पदाधिकारी, अधिकारी व नागरिक उपस्थित होते.

## ऐतिहासिक रंकाळ्याला राज्यपालांची प्रथमच भेट

कोल्हापूरचे ऐतिहासिक वैभव असलेल्या रंकाळा तलावाला राज्यपालांनी भेट द्यावी, अशी पहिलीच वेळ शुक्रवारी आली. दैनिक ‘पुढारी’चे व्यवस्थापकीय संपादक व उर्वरित महाराष्ट्र वैधानिक विकास मंडळाचे अध्यक्ष डॉ. योगेश जाधव यांनी राज्यपाल सी. विद्यासागर राव यांना रंकाळा तलावाला भेट देण्याची विनंती केली होती. त्याला प्रतिसाद देत राव यांनी आज भेट दिली.

पुढारी

# डिजिटल युगातील विद्यार्थी ज्ञानयुगाचे वारकरी :

(पान १ वरून) विद्यापीठाच्या लोककला केंद्रात शुक्रवारी राज्यपाल तथा कुलपती सी. विद्यासागर राव यांच्या अध्यक्षतेखाली झाला. याप्रसंगी डॉ. मेत्री बोलत होते. शाहू महाराज, कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, ज्येष्ठ विचारवंत डॉ. एन. डी. पाटील, उर्वरित महाराष्ट्र विकास मंडळाचे अध्यक्ष व दै. 'पुढारी'चे व्यवस्थापकीय संपादक, संचालक डॉ. योगेश जाधव, जिल्हाधिकारी दौलत देसाई, जि.प. मुख्य कार्यकारी अधिकारी अमन मित्तल यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

भारतीय मूल्यांचे महत्त्व सांगताना डॉ. मेत्री म्हणाले, आयुष्य किंवा उद्योग-व्यवसायात नीतिमूल्यांशी विद्यार्थ्यांनी कधीही तडजोड करू नये. २००८ च्या जागतिक मंदीच्या काळात अमेरिका-युरोपातील अनेक कंपन्या बंद पडत असताना भारतीय कंपन्या प्रगतिपथावर राहिल्या. नम्र, सहनशील आणि स्नेहभावाने साऱ्या जगाला जोडू शकता येते ही २५ देशांचा दौरा केल्यानंतर शिकवण आपणास मिळाली. देशाचे, विद्यापीठाचे नाव उज्ज्वल करण्यासाठी विद्यार्थ्यांनी सर्वोत्कृष्ट कामगिरीचा ध्यास धरला पाहिजे.

'ज्याचा कोणी विचार करीत नाही, अशा गोष्टींचा जो विचार करतो आणि जे इतर कोणी पाहू शकत नाही, अशी गोष्ट साध्य करतो तो खरा नेता होय', या स्वामी विवेकानंदांच्या उक्तीचा दाखला देत डॉ. मेत्री म्हणाले, वेगळेपणाचा ध्यास तुमच्यातील नेतृत्वगुणांचा विकास करतो. समर्थकांची संख्या वाढविण्यापेक्षा नेतृत्व करणाऱ्यांची संख्या वाढविणे हे खऱ्या नेत्याचे लक्षण आहे. नवनिर्मिती खालपासून वरपर्यंत गुणसूत्रांमध्ये असायला हवी. भारत जागतिक पातळीवर वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था असून आघाडीच्या तीन देशांपैकी पहिल्या क्रमांकाच्या दिशेने वाटचाल सुरू आहे.

युवकांना संधींची अनेक द्वारे खुली आहेत. ऑटोमेशन व आर्टिफिशियल इंटेलिजन्समध्ये सातत्याने होणाऱ्या प्रगतशील संशोधनांमुळे तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील भूमिका सातत्याने बदलत राहणार आहेत. अशा परिस्थितीत विद्यार्थ्यांनी सातत्याने नवीन ज्ञान, कौशल्ये आत्मसात करीत लवचिक भूमिका घेण्याची गरज आहे. व्यावसायिक जगतात स्थान कायम राखण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. कोणताही बॅक अप प्लॅन तयार असणे म्हणजे तुमची यशस्वी व्हायची तयारी नाही, असा अर्थ निघतो. त्यामुळे अपयशाची भीती न बाळगता धोका पत्करून, न डगमगता परिस्थितीला समोरे गेल्यास यश निश्चित मिळेल, असेही डॉ. मेत्री म्हणाले.

**विद्यापीठाची वाटचाल 'लोकल टू ग्लोबल' : कुलगुरू डॉ. शिंदे**

कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी शिवाजी विद्यापीठाचा वार्षिक अहवाल सादर केला. ते म्हणाले, उच्च शिक्षणाचे आंतरराष्ट्रीयीकरण, संशोधनातून उद्योगनिर्मिती, नावीन्यपूर्ण व अभिनव संशोधन, गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि भविष्यवेधी अभ्यासक्रमाचा आधार घेऊन विद्यापीठाची वाटचाल सुरू आहे. भारतातील सर्व शैक्षणिक संस्थांमध्ये विद्यापीठाची क्रमवारी ५६-६० अशी आहे. 'ब्रिक्स' देशांतील शैक्षणिक संस्थांमध्ये ही क्रमवारी २५१-२६० आहे. शिवाजी विद्यापीठाच्या 'लोकल टू ग्लोबल' वाटचालीमधील हा महत्त्वाचा टप्पा आहे.

विद्यापीठात सेंटर फॉर नॅनो फॅब्रिक्समध्ये नॅनो तंत्रज्ञानाच्या सहाय्याने आधुनिक कापडनिर्मितीच्या अनुषंगाने संशोधन करण्यात येणार आहे. भविष्यातील कपडे हे याच तंत्रज्ञानाच्या आधाराने निर्माण होतील. यासाठी विद्यापीठात हे केंद्र विकसित होत आहे, असे सांगून डॉ.

## सत्यजित पाटीलला राष्ट्रपती; साक्षी गावडेला कुलपती पदक

सुवर्णपदके प्रदान दीक्षान्त समारंभात शिवाजी विद्यापीठ पदार्थ विज्ञान विभागातील सत्यजित पाटील या विद्यार्थ्याला सर्वसाधारण कौशल्यासाठीचे राष्ट्रपती यांचे पदक व महावीर महाविद्यालयाची साक्षी गावडे हिला कला शाखेत सर्वाधिक गुण प्राप्त केल्याबद्दल कुलपती यांचे सुवर्णपदक कुलपती सी. विद्यासागर राव यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. यावेळी कुलपती यांच्या हस्ते ४० पीएच.डी. स्नातकांना पदवी प्रदान करण्यात आल्या. त्याचप्रमाणे १६ विविध पारितोषिकांचे प्रमुख पाहुणे डॉ. भीमराया मेत्री आणि कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते वितरण करण्यात आले.

## जगातील ३० लाख रोजगाराचे नियंत्रण 'रोबो-बॉस'कडून

सध्याचे युग हे 'इंडस्ट्री ४.०' अर्थात रोबोटिक्स आहे. गार्टनर यांच्या अहवालानुसार, आज जगातील ३० लाख रोजगार हे 'रोबो-बॉस'कडून नियंत्रित केले जात आहेत. सर्वसामान्य रोबोटस्‌चे नियंत्रण स्मार्ट-रोबोटस् करीत आहेत. व्यावसायिक निर्णय हे पारदर्शी होण्यासाठी रोबोटची मदत घेतली जात आहे. 'डिलॉईट'च्या माहितीनुसार, मानवाच्या १,२०० वर्तनांपैकी ६५ वर्तनं सध्या रोबोटस्‌मध्ये विकसित करण्यात तंत्रज्ञानाला यश आले आहे.

## कुलपतींकडून स्नातकांना उपदेश

कुलपती सी. विद्यासागर राव यांनी स्नातकांना उपदेश केला. नवस्नातक पदवी, पदविका, प्रमाणपत्रे घेऊन नव्या युगात प्रवेश करीत असताना वाणी आणि कृतीद्वारे आपली पात्रता सिद्ध करावी, असा विद्यार्थ्यांना उपदेश केला.

पुढारी

# डिजिटल युगातील विद्यार्थी ज्ञानयुगाचे वारकरी : डॉ. मेत्री

## शिवाजी विद्यापीठाचा ५५ वा दीक्षान्त समारंभ थाटात




कोल्हापूर : दीक्षान्त समारंभात सत्यजित पाटील या विद्यार्थ्याला राष्ट्रपती यांचे पदक व साक्षी गावडे हिला कुलपती यांचे सुवर्णपदक राज्यपाल सी. विद्यासागर राव यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. यावेळी तिरुचिरापल्ली 'आयआयएम'चे संचालक डॉ. भीमराया मेत्री, कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर आदी. (छाया : पप्पू अत्तार)

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

मोठी स्वप्ने पाहा, सर्जनशील बना, आत्मपरीक्षण करा, चांगल्याचा ध्यास धरा, नवतंत्रज्ञान आत्मसात करा व भारतीय मूल्यसंस्कृती जोपासा, अशी यशस्वी जीवनाची पंचसूत्री तिरुचिरापल्ली येथील भारतीय प्रबंध संस्थान (आयआयएम)चे संचालक डॉ. भीमराया मेत्री यांनी शिवाजी विद्यापीठाच्या दीक्षान्त समारंभात विद्यार्थ्यांना दिली. लॅपटॉप, स्मार्टफोन, समाजमाध्यमे अशा वैविध्यपूर्ण गोष्टी असणाऱ्या डिजिटल युगातील नवी पिढी भाग्यवान आहे. ते नवतंत्रज्ञानाच्या काळातील ज्ञानयुगाचे वारकरी आहेत, असेही ते म्हणाले.

शिवाजी विद्यापीठाचा ५५ वा दीक्षान्त समारंभ **पान ७ वर ▶**

पुढारी

# 'हुसेनसागर'च्या धर्तीवर रंकाळ्याचा विकास करावा

## डॉ. योगेश जाधव यांच्या विशेष निमंत्रणावरून राज्यपालांकडून तलावाची पाहणी



कोल्हापूर : राज्यपाल सी. विद्यासागर राव यांनी शुक्रवारी सहकुटुंब रंकाळा तलावाला भेट दिली. दैनिक 'पुढारी'चे व्यवस्थापकीय संपादक व उर्वरित महाराष्ट्र वैधानिक विकास मंडळाचे अध्यक्ष डॉ. योगेश जाधव यांनी त्यांना माहिती दिली. यावेळी महापौर सौ. सरिता मोरे, सौ. विनोधा राव, जिल्हाधिकारी दौलत देसाई, संजय शिंदे, श्रीधर पाटणकर, नेत्रदीप सरनोबत आदी. (छाया : पप्पू अत्तार)

कोल्हापूर : प्रतिनिधी

हैदराबाद येथील हुसेनसागर तलावाच्या धर्तीवर कोल्हापूरचे ऐतिहासिक वैभव असणाऱ्या रंकाळा तलावाचा विकास करावा. याकरिता त्या तलावाचे सुशोभीकरण केलेल्या कन्सल्टंट कंपनीचा अनुभव उपयोगी पडेल. 'स्वच्छ भारत'सारख्या योजनांचे सहाय्य घेऊन रंकाळा संवर्धन आणि संरक्षणाची योजना राबवता येईल, असा विश्वास राज्यपाल सी. विद्यासागर राव यांनी शुक्रवारी व्यक्त केला.

उर्वरित महाराष्ट्र वैधानिक विकास मंडळाचे अध्यक्ष तथा दैनिक 'पुढारी'चे व्यवस्थापकीय संपादक डॉ. योगेश जाधव यांच्या विशेष आमंत्रणावरून शुक्रवारी राज्यपाल राव यांनी रंकाळा तलाव परिसराची पाहणी केली. आजवरच्या इतिहासात राज्यपालांनी रंकाळा तलावाला भेट दिल्याची ही पहिलीच वेळ होती. यामुळे या भेटीला विशेष महत्त्व प्राप्त झाले.

डॉ. योगेश जाधव यांनी, कोल्हापूरला लाभलेला सुमारे तीन हजार वर्षांचा इतिहास, शिवछत्रपती, रणरागिणी ताराराणी आणि लोकराजा राजर्षी शाहूंचे दूरदृष्टीचे व पुरोगामी विचारांचे कार्य यापासून ऐतिहासिक रंकाळा तलावाचे शाहूनगरी कोल्हापूरसाठी असणारे महत्त्व, इतिहास, तलावाचा सभोवताल व त्यावर आधारित जीवसृष्टी आणि सद्यपरिस्थिती याबाबत इत्थंभूत माहिती दिली.

रंकाळा टॉवर परिसरातील राजघाट येथे राज्यपालांनी सहकुटुंब भेट दिली. राज्यपालांनी पत्नी सौ. विनोधा राव आणि कुटुंबीयांसह रंकाळा तलावाच्या पार्श्वभूमीवर आवर्जून छायाचित्रे घेण्यास सांगितली. या भेटीची आठवण म्हणून रंकाळा तलावाचे जुने दुर्मीळ छायाचित्र देऊन डॉ. जाधव यांनी राज्यपालांचा सत्कार केला. यावेळी रंकाळा तलाव संवर्धन आणि सौंदर्यीकरणासाठी १५ कोटींच्या निधीस मंजुरी द्यावी, याबाबतचे निवेदन डॉ. जाधव यांनी राज्यपाल राव यांना दिले. पान ७ वर

### रंकाळा संवर्धनासाठी राज्यपाल सकारात्मक

जगभरातील पर्यटकांचे आकर्षण आणि कोल्हापूरचे ऐतिहासिक वैभव असणाऱ्या रंकाळा तलावाचे जतन-संवर्धनाबरोबरच सौंदर्यीकरण व्हावे. रंकाळा तलावावर आधारित पर्यटन व्यवसाय विकसित व्हावा, तलावासभोवताली पर्यावरण विकसित होऊन जीवसृष्टीचे संरक्षण व्हावे, यासाठीच्या १५ कोटी रुपयांच्या निधीला मंजुरी देण्यात यावी, याबाबतचे निवेदन देत डॉ. योगेश जाधव यांनी रंकाळ्याच्या संवर्धनाची आवश्यकता आणि त्याचे महत्त्व पटवून दिले. डॉ. जाधव यांच्या मागणीला राज्यपाल राव यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. जिल्हाधिकारी दौलत देसाई यांच्याशीही राव यांनी चर्चा करीत याबाबत विविध योजनांद्वारे जे करता येईल त्याबाबत तातडीने कार्यवाही करावी, अशी सूचना केली.

Kolhapur Edition
23 Feb, 2019 Page No. 1
Powered by : erelego.com

# ग्रंथदिंडीतून वाचनसंस्कृतीचा संदेश

कोल्हापूर टाइम्स टीम



शिवाजी विद्यापीठाच्या दीक्षान्त समारंभानिमित्त काढण्यात आलेल्या ग्रंथदिंडीत सहभागी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, महेश काकडे, नमिता खोत, डॉ. डी. टी. शिर्के आदी.

आयुष्यातील ग्रंथाचे स्थान गुरुसम आहे या उक्तीनुसार ग्रंथदिंडीतून वाचनसंस्कृतीचा संदेश देत शिवाजी विद्यापीठाच्या ५५ व्या दीक्षान्त सोहळ्याला शुक्रवारी सकाळी आठ वाजता प्रारंभ झाला. वाचनातून विचार प्रगल्भ करा, अशा शब्दांत प्रबोधन करत या ग्रंथदिंडीत महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसह विद्यापीठातील अधिकाऱ्यांनी ग्रंथजागर केला. पुलवामा येथील दहशतवादी हल्ल्यात शहीद झालेल्या जवानांना श्रद्धांजली वाहून या ग्रंथदिंडीला सुरुवात करण्यात आली. कमला कॉलेज ते शिवाजी विद्यापीठ या मार्गावर दिंडीसोबत विविध पथनाट्यातून विचारांची पेरणी करण्यात आली.

सकाळी साडेआठ वाजता कमला कॉलेज येथून शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे व ताराराणी विद्यापीठाचे कार्यकारी अध्यक्ष डॉ. क्रांतिकुमार पाटील यांच्या हस्ते पालखीत ठेवण्यात आलेल्या ग्रंथांचे पूजन करून दिंडीला प्रारंभ झाला. पालखीची सजावट आकर्षक फुलांनी करण्यात आली होती. राजारामपुरी, आईचा पुतळा, सायबर चौक, दूरशिक्षण केंद्र या मार्गे दिंडी शिवाजी विद्यापीठाच्या मुख्य इमारतीसमोर आली.

ग्रंथदिंडी मिरवणुकीत महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी विविध सामाजिक प्रश्नांकडे लक्ष वेधणारे फलक, देखावे सादर केले. कमला कॉलेजच्या विद्यार्थिनींनी ग्रंथदिंडीनिमित्त 'स्त्री भ्रूण हत्या रोखूया' हा संदेश देणारे पथनाट्य सादर केले. शहाजी कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी 'क्षयरोग...एक भयानक वास्तव' या विषयावर प्रबोधन फलकाच्या माध्यमातून लक्ष वेधले.

यावेळी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे, डॉ. डी. आर. मोरे, ग्रंथपाल नमिता खोत, ए. ए. गुरव, डॉ. भारती पाटील, डॉ. पी. एस. पाटील, डॉ. पी. डी. राऊत आदी मान्यवर तसेच महाविद्यालयांचे प्राचार्य, प्राध्यापक आदी उपस्थित होते.



पदवीदान सोहळ्याच्या निमित्ताने मित्रमैत्रिणी भेटल्यानंतर ग्रुप फोटोला अशा प्रसन्न पोझ देत तरुणाईने या कार्यक्रमाचा आनंद लुटला.



विद्यापीठाच्या आवारात उभारण्यात आलेल्या बूथवर पदवी प्रमाणपत्रे घेण्यासाठी विद्यार्थ्यांची झालेली गर्दी.



पदवी प्रमाणपत्रासोबत सेल्फी काढण्याचा मोह विद्यार्थिनींना आवरला नाही.

# विद्यापीठात ज्ञानमेळा

## ५५ वा दीक्षान्त सोहळा उत्साहात

कोल्हापूर टाइम्स टीम

उच्च शिक्षणाच्या प्रवासातील मुख्य टप्पा असलेल्या पदवीदान समारंभासाठी उत्सुक असलेली तरुणाई, विद्यापीठाच्या प्रसन्नदायी प्रांगणात जमलेला मैत्रीचा मेळा, मान्यवरांच्या हस्ते पदवीप्रमाण स्वीकारण्याचा आनंद आणि सेल्फीसोबत यशाचे क्षण क्लिक करण्याचा आनंद अशा उत्साही वातावरणाने शुक्रवारचा दिवस शिवाजी विद्यापीठाच्या आवारात रंगला. विद्यापीठाच्या ५५ व्या दीक्षान्त समारंभाच्यानिमित्ताने पीएचडी, एम. फिल पदवीसह अधिविभागातील विद्याशाखांची पदवी घेण्यासाठी आलेल्या दोन हजारांहून अधिक विद्यार्थ्यांनी पदवीप्रमाणपत्र स्वीकारण्याचा महत्त्वाचा क्षण अनुभवला.

पदवीदान कार्यक्रम दुपारी दोन वाजता होता. मात्र विद्यार्थ्यांची पावले सकाळी दहा वाजल्यापासूनच विद्यापीठाच्या प्रांगणाकडे वळू लागली. विद्यापीठाच्या मुख्य प्रवेशद्वारातून आत आल्यानंतर छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याच्या साक्षीने विद्यार्थी दीक्षान्त समारंभातील विविध उपक्रमात सहभागी झाले. लोककला केंद्र मंडपाशेजारी उभारण्यात आलेल्या बूथवर विद्यापीठातील अधिविभागातील विद्यार्थ्यांना पदवीप्रमाणपत्रे वितरीत करण्याची व्यवस्था करण्यात आली होती. याठिकाणी नऊ बूथची व्यवस्था करण्यात आली होती. प्रत्येक बूथवर दोन कर्मचारी विद्यार्थ्यांना त्यांच्या शाखा व क्रमांकानुसार पदवीप्रमाणपत्र देत होते.

पदवीप्रमाणपत्र घेण्यासाठी विद्यार्थी एकमेकांशी संपर्क करून मित्रमैत्रिणींच्या ग्रुपने येत होते. विद्यापीठाच्या आवारात भेटल्यानंतर एकमेकांशी गप्पा मारत बूथच्या दिशेने जात असल्याने आवारात वेगळाच माहोल निर्माण झाला. पदवीप्रमाणपत्र घेतल्यानंतर ग्रंथालयासमोरील झाडांच्या पारावर बसून पदवीप्रमाण उत्सुकतेने न्याहाळत असल्याचे चित्र दिसत होते. तर यावर्षीपासून नव्या विद्यापीठ कायद्यानुसार कॉलेजस्तरावर देण्यात येणाऱ्या पदवीप्रमाणपत्रांचे बॉक्स कॉलेज व्यवस्थापन प्रतिनिधींना देण्याची व्यवस्था दूरशिक्षण विभाग आवारात करण्यात आली होती. कोणत्या कॉलेजसाठी कोणत्या बूथवर व्यवस्था केली आहे, याचा तपशील असलेला फलक लोककला केंद्रासमोर लावण्यात आला होता.

दरम्यान, यावर्षी दीक्षान्त सोहळ्याचे स्वरूप बदलल्याचा परिणाम विद्यार्थ्यांच्या गर्दीवर झाला. सकाळच्या सत्रात विद्यार्थ्यांची संख्या कमी असल्याने आवारात शांतता होती. मात्र दुपारी एकच्या दरम्यान काही प्रमाणात विद्यार्थ्यांच्या गर्दीने विद्यापीठ आवार गजबजून गेला. बूथवर पदवी प्रमाणपत्र घेतल्यानंतर विद्यार्थ्यांनी विद्यापीठ आवारातील जागा शोधून फोटो काढले. दीक्षान्त कार्यक्रमाच्या निमित्ताने भरवण्यात आलेल्या ग्रंथमहोत्सवाला भेट देऊन विद्यार्थ्यांनी पुस्तकांची खरेदी केली.



ज्ञानदंडासह दीक्षान्त मिरवणुकीचे नेतृत्व करताना परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे. सोबत विविध अधिविभागांतील प्रमुख.

### १ पुरस्कारप्राप्त विद्यार्थी कुटुंबीयांसमवेत

विद्यापीठाच्या दीक्षान्त सोहळ्यात देण्यात येणारा राष्ट्रपती पदक पुरस्कार व कुलपती पदक पुरस्कार यंदा सत्यजित पाटील व साक्षी गावडे यांना मिळाला. या दोघांनीही आपल्या कुटुंबीयांसमवेत या सोहळ्यालाला उपस्थिती दिली. तसेच अधिविभागात प्रथम आलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांस पीएचडी व एम. फील. पदवी मिळालेल्या विद्यार्थ्यांनीही आपल्या कुटुंबीय व नातेवाईकांना निमंत्रित केले होते. आपल्या मुला, मुलींना सन्मानपूर्वक पुरस्कार व पदवी स्वीकारताना पाहून कुटुंबीयांचे डोळे पाणावले.

### २ सेल्फीमूड हिट

पदवीप्रमाण-पत्रावाचची उत्सुकता विद्यापीठाच्या आवारात अव्याहतपणे व उत्साहात सुरू असलेल्या सेल्फीमूडने अधिकच हिट केली. तसेच ग्रुप फोटोलाही उधाण आले. फोटो काढल्यानंतर लगेच सोशल मीडियावर अपलोड केला जात होता. त्यामुळे पदवीप्रमाणपत्राच्या आनंदासोबत लाइक, शेअर, कमेंट या शब्दांचीही चर्चा सुरू होती.

### ३ मिरवणुकीचे आकर्षण

दीक्षान्त समारंभासाठी प्रमुख पाहुणे आयआयएमचे संचालक डॉ. भीमराया मेत्री आणि अध्यक्ष राज्यपाल सी. विद्यासागर राव हे असल्यामुळे राजकीय व प्रशासकीय शिष्टाचारात सर्व कार्यक्रमाची रचना करण्यात आली होती. दीक्षान्त सोहळ्यात मान असलेल्या भगव्या रंगाचा गाऊन परिधान करून पुरस्कारप्राप्त व गुणवंत विद्यार्थ्यांनी मिरवणुकीत सहभाग घेतला. दुपारी दीड वाजता विद्यापीठातील मुख्य इमारतीपासून ज्ञानदंडासमवेत मिरवणुकीला प्रारंभ झाला. परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे यांच्या हातात ज्ञानदंड देण्यात आला होता. काकडे यांनी मिरवणुकीचे नेतृत्व केले. यावेळी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्यासह उपकुलसचिव, सर्व अधिविभागाचे प्रमुख, अधिकार मंडळाचे प्रमुख सदस्य आदी उपस्थित होते. दीक्षान्त सभामंडपासमोर उभारण्यात आलेल्या मंडपातून ही मिरवणूक मुख्य व्यासपीठापर्यंत आल्यानंतर राष्ट्रगीताने मुख्य दीक्षान्त कार्यक्रमाला प्रारंभ झाला.

# रंकाळा संवर्धनाच्या हालचाली गतिमान

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

शहराचे वैभव असलेल्या ऐतिहासिक रंकाळा तलाव संवर्धनासाठी शुक्रवारी हालचाली गतिमान झाल्या. केंद्र व राज्य सरकारकडून संवर्धनासाठी निधी मिळवण्याचे प्रयत्न पुन्हा एकदा सुरू झाले. राज्यपाल सी. विद्यासागर राव यांनी ऐतिहासिक रंकाळा तलावाला भेट देऊन पाहणी करताना निधीसाठी सकारात्मक प्रतिसाद देत संवर्धन व संरक्षणाबाबत काही सूचनाही केल्या.

अमित गद्रे



रंकाळा तलावाची पाहणी करताना राज्यपाल सी. विद्यासागर, विनोधी राव, जिल्हाधिकारी दौलत देसाई, डॉ. योगेश जाधव, श्रीधर पाटणकर, आदी.

## राज्यपालांनी केली रंकाळ्याची पाहणी

शिवाजी विद्यापीठाच्या दीक्षान्त समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून विद्यासागर राव यांना निमंत्रित केले होते. सकाळी आगमन झाल्यानंतर त्यांनी प्रथम करवीरनिवासिनी अंबाबाईचे दर्शन पत्नी विनोधा व दोन मुलींसह घेतले. यावेळी त्यांच्यासोबत पश्चिम महाराष्ट्र देवस्थान समितीचे अध्यक्ष महेश जाधव, समितीच्या सदस्या संगीता खाडे, शिवाजी जाधव, सचिव विजय पोवार, व्यवस्थापक धनाजी जाधव उपस्थित होते. कडक सुरक्षा व्यवस्थेत त्यांनी मंदिर परिसराची पाहणी केली. त्यानंतर ते रंकाळा तलावाकडे रवाना झाले.

रंकाळा टॉवर येथे मंडप उभारणी करून राव यांची बसण्याची व्यवस्था केली होती. यावेळी उर्वरित महाराष्ट्र वैधानिक विकास मंडळाचे अध्यक्ष डॉ. योगेश जाधव यांनी राज्यपाल राव आणि विनोधा राव यांना रंकाळ्याचे ऐतिहासिक महत्त्व आणि पार्श्वभूमी सांगितली.

डॉ. जाधव यांनी रंकाळा तलाव संवर्धनासाठी १५ कोटींचा निधी देण्याची मागणी निवेदनाद्वारे केली. यावेळी राज्यपाल राव यांनी हैदराबाद येथील हुसेनसागर तलावाप्रमाणे सुशोभिकरणासाठी सल्लागार कंपनीचा अनुभव उपयोगी पडेल, अशी सूचना केली.

यावेळी महापौर सरिता मोरे, जिल्हाधिकारी दौलत देसाई, जिल्हा परिषदेचे सीईओ अमन मित्तल, पोलिस अधीक्षक डॉ. अभिनव देशमुख, महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त श्रीधर पाटणकर, उपअधीक्षक डॉ. प्रशांत अमृतकर, निवासी उपजिल्हाधिकारी संजय शिंदे, सहायक उपायुक्त मंगेश शिंदे, नेत्रदीप सरनोबत, आदी उपस्थित होते.

# ‘उत्तुंग झेप घेण्याची स्वप्ने पाहा’

प्रतिनिधी, कोल्हापूर

**प्रगतीसाठी अंतर्मुख** होऊन नावीन्याची कास धरा. वेगळे काही करण्याचा ध्यास बाळगा आणि यासाठी उत्तुंग झेप घेण्याची स्वप्ने पाहा, असा संदेश तिरुचिरापल्ली येथील भारतीय व्यवस्थापन संस्थेचे संचालक डॉ. भीमराया मेत्री यांनी गुरुवारी येथे विद्यार्थ्यांना दिला.

शिवाजी विद्यापीठाच्या ५५ व्या दीक्षान्त समारंभ महाराष्ट्राचे राज्यपाल सी. विद्यासागर राव यांच्या हस्ते स्नातकांना पदवी प्रदान करुन संपन्न झाला. या समारंभास डॉ. मेत्री हे प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. या वेळी ४८ हजार ५१५ स्नातकांना पदवी प्रदान करण्यात आल्या.

राज्यपाल सी. विद्यासागर राव यांनी स्नातकांना उपदेश केला. ते म्हणाले, नवस्नातक पदवी, पदविका, प्रमाणपत्रे घेऊन नव्या युगात प्रवेश करीत असताना आपल्या वाणी व कृतीतून आपली पात्रता सिद्ध करावी. डॉ. मेत्री म्हणाले, की जागतिक मंदीच्या काळातही भारतीय कंपन्यांनी भारतीय अर्थव्यवस्थेला सहायभूत होईल, अशीच कामगिरी केली आहे.



**शिवाजी विद्यापीठच्या दीक्षान्त समारंभात राज्यपाल सी. विद्यासागर राव यांच्या हस्ते स्नातकांना पदवी प्रदान करण्यात आली . (छाया- राज मकानदार)**

जगातील प्रमुख तीन अर्थव्यवस्थांमध्ये भारताचा समावेश होता, ही भारताच्यादृष्टीने अभिमानाची बाब आहे. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी शिवाजी विद्यापीठाचा वार्षिक अहवाल सादर केला.

ग. गो. जाधव पत्रकारिता इमारतीची पायाभरणी

विद्यापीठाच्या परिसरात पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासन केंद्र इमारतीच्या पायाभरणीचा समारंभ महाराष्ट्राचे राज्यपाल सी. विद्यासागर राव यांच्या हस्ते झाला. पहिल्या टप्प्यातील दीड कोटीच्या कामांचा शुभारंभही त्यांच्या हस्ते करण्यात आला. समारंभास पालकमंत्री चंद्रकांत पाटील, ज्येष्ठ पत्रकार डॉ. प्रतापसिंह जाधव, उर्वरित महाराष्ट्र विकास मंडळाचे अध्यक्ष डॉ. योगेश जाधव, जिल्हाधिकारी दौलत देसाई उपस्थित होते.

### महालक्ष्मी दर्शन

करवीर निवासिनी महालक्ष्मीचे दर्शन घेऊन राज्यपाल सी. विद्यासागर राव यांनी कोल्हापूर दौऱ्याला सुरुवात केली. त्यानंतर त्यांनी कोल्हापूरचे जलवैभव असलेल्या रंकाळा तलावाला भेट दिली.

लोकमत



शिवाजी विद्यापीठाच्या दीक्षान्त समारंभानिमित्त आयोजित ग्रंथदिंडीचे उद्घाटन कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते झाले. या दिंडीमध्ये विलास नांगरेकर, नमिता खोत, महेश काकडे, अमित कुलकर्णी आदी सहभागी झाले.

Kolhapur Main
Page No. 5 Feb 23, 2019
Powered by: erelego.com

लोकमत

## नगरसेवक, पदाधिकाऱ्यांनी फिरविली पाठ : महापौरही उशिरा पोहोचल्या; अधिकारी धारेवर

# राज्यपालांच्या रंकाळा भेटीत मानापमान

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** राज्यपाल सी. विद्यासागर राव यांच्या रंकाळा भेटीत महापालिकेतील मानापमान चांगलेच रंगले. नियोजित वेळेपेक्षा बारा मिनिटे आधीच पोहोचलेल्या राज्यपालांचे स्वागत करण्यास महापालिकेचा एकही पदाधिकारी अथवा नगरसेवक उपस्थित नव्हता. दहा मिनिटांची रंकाळा भेट आटोपून राज्यपाल वाहनांच्या ताफ्याकडे जात असताना महापौर सरिता मोरे अक्षरश: धावतच पोहोचल्या. राज्यपाल निघून गेल्यानंतर मात्र महापौरांनी अधिकाऱ्यांना चांगलेच खडसावले. 'आम्हाला का निरोप दिले नाहीत?' असा सवाल त्यांनी अधिकाऱ्यांना केला. 'पीआरओ' कार्यालयाकडून निरोप दिले होते,' असा खुलासा अधिकाऱ्यांनी केला; मात्र तो न पटल्याने महापौर नाराज होऊन तेथून निघून गेल्या.

राज्यपाल सी. विद्यासागर राव शुक्रवारी कोल्हापूर दौऱ्यावर आले होते. त्यांचा दौरा गुरुवारी दुपारी निश्चित झाला. सायंकाळी तर ते रंकाळा तलावास भेट देणार असल्याची माहिती मनपा प्रशासनास प्राप्त झाली. तोपर्यंत महापालिका कामकाज बंद झाले होते. तरीही वरिष्ठ अधिकारी यांनी रात्री तलावाजवळील नियोजित भेटीच्या ठिकाणची पाहणी केली. शहर अभियंता नेत्रदीप सरनोबत, उपशहर अभियंता रमेश मस्कर यांनी टॉवर आणि परिसरातील फरशा, रस्ते पाण्याने धुऊन घेतले. त्यानंतर शुक्रवारी पहाटे पाच वाजल्यापासून आरोग्य विभागाकडून स्वच्छता मोहीम राबवून परिसर स्वच्छ केला. एक छोटेखानी शामियाना उभारून तेथे रेड कारपेटसुद्धा अंथरले. ही सर्व तयारी पाहण्याकरिता अतिरिक्त आयुक्त श्रीधर पाटणकर, उपायुक्त मंगेश शिंदे, आरोग्याधिकारी डॉ. दिलीप पाटील, शहर अभियंता नेत्रदीप सरनोबत जातीनिशी उपस्थित होते.

सकाळी १० वाजून ५० मिनिटांनी राज्यपाल कुटुंबियांसह रंकाळा तलावाच्या टॉवर परिसरात येणार होते; परंतु प्रत्यक्षात ते १० वाजून ३५ मिनिटांनीच तेथे पोहोचले. रंकाळा तलाव हा मनपाच्या मालकीचा असल्याने त्यांचे स्वागत करण्यास तिथे पदाधिकारी, नगरसेवक उपस्थित राहणे अपेक्षित होते. मात्र, त्यांच्या गैरहजेरीत उर्वरित महाराष्ट्र वैधानिक विकास महामंडळाचे अध्यक्ष योगेश जाधव, अतिरिक्त आयुक्त श्रीधर पाटणकर यांनी त्यांचे स्वागत केले. पंधरा मिनिटे राज्यपाल रंकाळा तलावावर पाहणी करीत होते. त्यांना जाधव यांच्यासह नेत्रदीप सरनोबत यांनी तलावावर होणार असलेल्या कामांची माहिती दिली.

राज्यपालांनी टॉवर, संध्यामठ यांची (लांबूनच) पाहणी केल्यानंतर 'विकासकामांचे आराखडे घेऊन मुंबईला या,' एवढेच ते बोलले आणि गाड्यांकडे वळले. त्यावेळी महापौर मोरे पोहोचल्या. त्यांना राज्यपालांशी संवादही साधता आला नाही. राज्यपाल गाडीत बसले, निघून गेले. त्यानंतर महापौरांनी सरनोबत, मस्कर यांना बोलावून घेतले आणि 'राज्यपाल रंकाळा तलावास भेट देणार असल्याची कल्पना का दिली नाही?' असा संतप्त सवाल केला. त्यावेळी सरनोबत यांनी 'पीआरओं'ना माहिती कळवायला सांगितले होते, असे उत्तर दिले. मात्र, त्या उत्तराने महापौरांचे समाधान झाले नाही. त्या रागातच निघून गेल्या. राज्यपाल गेल्यानंतर दहा मिनिटांनी स्थायीचे सभापती शारंगधर देशमुख तेथे पोहोचले. त्यांनी अधिकाऱ्यांना धारेवर धरले.

आदित्य वेल्हाळ



राज्यपाल सी. विद्यासागर राव यांनी त्यांच्या धावत्या कोल्हापूर दौऱ्यात शुक्रवारी सकाळी ऐतिहासिक रंकाळा तलावास भेट देऊन तलावाचे महत्त्व समजावून घेतले. त्यांच्यासोबत त्यांच्या पत्नी विनोधा राव व कुटुंबीय उपस्थित होते.

> राज्यपाल रंकाळ्याची पाहणी करण्यास येत आहेत, याची कोणतीही कल्पना मला आधी मिळाली नाही. विमानतळावर त्यांचे स्वागत करुन मी महापालिकेत आले. तेव्हा नेत्रदीप सरनोबत व डॉ. दिलीप पाटील यांचे फोन आले. अधिकारी चुका करतात आणि त्याचा दोष पदाधिकाऱ्यांवर येतो; म्हणून मी घाईगडबडीने तेथे पोहोचले.
>
> **- सरिता मोरे, महापौर**

Hello Kolhapur
Page No. 2 Feb 23, 2019
Powered by: erelego.com

लोकमत

आदित्य वेल्हाळ





कोल्हापुरात शुक्रवारी शिवाजी विद्यापीठाच्या ५५ व्या दीक्षान्त समारंभाच्या प्रारंभी दीक्षान्त मिरवणूक काढण्यात आली. परीक्षा नियंत्रक महेश काकडे हे दीक्षान्त मिरवणुकीने ज्ञानदंड घेऊन कार्यक्रमस्थळी आले, तर दुसऱ्या छायाचित्रात पदवी मिळाल्यानंतर युवक-युवतींनी अशी एकत्रित उडी घेऊन आनंद व्यक्त केला.

Kolhapur Main
Page No. 5 Feb 23, 2019
Powered by: erelego.com

लोकमत



कोल्हापुरात शुक्रवारी शिवाजी विद्यापीठातील पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासन केंद्राच्या इमारतीची पायाभरणी राज्यपाल सी. विद्यासागर राव यांच्या हस्ते झाली. यावेळी कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे, पालकमंत्री चंद्रकांत पाटील, डॉ. योगेश जाधव, दै. 'पुढारी'चे मुख्य संपादक डॉ. प्रतापसिंह जाधव, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, आदी मान्यवर उपस्थित होते.

# 'ग. गो. जाधव अध्यासन' इमारतीची पायाभरणी

## राज्यपाल यांची प्रमुख उपस्थिति

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या परिसरात पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासन केंद्राच्या इमारतीचे कोनशिला अनावरण आणि पायाभरणी राज्यपाल सी. विद्यासागर राव यांच्या हस्ते शुक्रवारी करण्यात आली. पहिल्या टप्प्यातील दीड कोटीच्या कामांचा प्रारंभ यावेळी करण्यात आला.

या अध्यासनाच्या केंद्राच्या इमारतीचे बांधकाम क्षेत्रफळ २१२१ चौरस मीटर असून, या उपक्रमाची माहिती कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांनी यावेळी राज्यपाल सी. विद्यासागर राव यांना दिली.

यावेळी पुढील टप्प्यासाठी तत्काळ निधी देऊ, असे आश्वासन पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिले. या कार्यक्रमास दै. 'पुढारी'चे मुख्य संपादक डॉ. प्रतापसिंह जाधव, उर्वरित महाराष्ट्र विकास मंडळाचे अध्यक्ष डॉ. योगेश जाधव, जिल्हाधिकारी दौलत देसाई, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अमन मित्तल, पोलीस अधीक्षक डॉ. अभिनव देशमुख, प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र विभागाच्या प्रमुख डॉ. निशा मुडे-पवार, माजी विभागप्रमुख रत्नाकर पंडित, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता संभाजी माने, कार्यकारी अभियंता संजय सोनवणे, आदी उपस्थित होते.

लोकमत

## बदललेल्या स्वरुपाचा परिणाम : विद्यार्थ्यांतून संमिश्र प्रतिक्रिया

# दीक्षान्त समारंभास गर्दी कमी, उत्साह मोठा

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : नवीन विद्यापीठ कायद्यातील परिनियमांमुळे यावर्षी शिवाजी विद्यापीठाच्या दीक्षान्त समारंभाचे स्वरुप बदलले. हे स्वरुप बदलल्याने या समारंभास शुक्रवारी विद्यार्थ्यांची गर्दी कमी होती. मात्र, अधिविभागांतील ज्या स्नातकांना या समारंभात पदव्या प्रदान करण्यात आल्या, त्यांच्यामध्ये मोठा उत्साह दिसून आला.

विद्यापीठाच्या परीक्षा विभागाने अधिविभागांतील स्नातकांना पदवी प्रदान करण्यासाठी लोककला केंद्राच्या परिसरात नऊ स्टॉल उभारले होते. त्या ठिकाणी सकाळी नऊ वाजल्यापासून स्नातकांची गर्दी झाली. दूरशिक्षण केंद्रात महाविद्यालयांच्या प्रतिनिधींनी पदवीप्रमाणपत्रे स्वीकारली. प्रमाणपत्र घेतल्यानंतर विद्यार्थी-विद्यार्थिनींनी पालक, मित्र-मैत्रिणींसमवेत मुख्य इमारतीसमोरील बगीचा गाठला. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारुढ पुतळ्यासमोर पदवी हातात घेऊन अनेकांनी छायाचित्रे काढून घेतली. काहींनी पदवीचा पोशाख घालून छायाचित्रे टिपली. ग्रंथमहोत्सवात फेरी मारली. अनेक विद्यार्थी-विद्यार्थिनींनी विद्यापीठातील परिसरात विविध ठिकाणी 'सेल्फी' घेत आनंद व्यक्त केला. दरवर्षीपेक्षा यंदा गर्दी कमी झाल्याचे ठळकपणे जाणवत होते.





शिवाजी विद्यापीठाच्या दीक्षान्त समारंभामध्ये एका स्नातकाच्या आईने असा सेल्फी घेत आनंद व्यक्त केला. दुसऱ्या छायाचित्रात पदवी मिळाल्याचा आनंद युवतीच्या चेहऱ्यावर फुलला होता.

या समारंभासाठी राज्यपाल उपस्थित असल्याने विद्यापीठ परिसरात कडक पोलीस बंदोबस्त तैनात होता. महाविद्यालयांनी पुढील ३० दिवसांच्या आत 'ग्रॅज्युएशन डे' हा कार्यक्रम घेऊन त्यांच्या विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्रे प्रदान करावयाची आहेत. दरम्यान, दीक्षान्त समारंभाच्या बदललेल्या स्वरुपाबाबत विद्यार्थ्यांतून संमिश्र प्रतिक्रिया व्यक्त झाल्या.

कोलोली (ता. पन्हाळा) येथील सचिन चव्हाण म्हणाला, यावर्षी स्वरुप बदलल्याने काहीतरी चुकल्यासारखे वाटले. या समारंभाचे पूर्वीप्रमाणे स्वरुप ठेवून महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांनाही विद्यापीठातच पदवी देण्याचे नियोजन विद्यापीठ प्रशासनाने करावे.

कोल्हापुरातील योगिता गांगण म्हणाली, दीक्षान्त समारंभ म्हटले की, विद्यार्थ्यांची गर्दी, जुन्या मैत्रिणींची भेट असे एक वेगळे वातावरण असायचे. यावर्षी हे वातावरण अनुभवता आले नाही. विद्यापीठाच्या पारितोषिकाची मानकरी ठरलेली भाग्यश्री माने हिने या बदललेल्या स्वरूपाचे स्वागत केले.

### पारितोषिक प्राप्त विद्यार्थी

राधिका यादव, विद्या पिंपळे, सूरज चौगुले, दिग्विजय पाटील, अनिता पुकळे, नाझनीन दांगर, पूनम शिंगाडे, नीलम पाटील, माधुरी पाटील, भाग्यश्री माने, अंजली पाटील, विश्वनाथ पाटील, प्राजक्ता पाटील, रवींद्र बनकर, श्रीतेज चंदनशिवे यांना व्यासपीठावर पारितोषिके प्रदान करण्यात आली.

### आकडेवारी दृष्टिक्षेपात

- व्यासपीठावर प्रदान करण्यात आलेल्या पीएच.डी. : ४०
- अधिविभागातील पदवी घेतलेल्या स्नातकांची संख्या : २५००
- पदवी प्रमाणपत्रे स्वीकारलेल्या महाविद्यालयांची संख्या : २२४

लोकमत

# ग्रंथदिंडीतून वाचनसंस्कृतीचा जागर

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** विविध विषयांवर प्रबोधन करणारी पथनाट्ये, संदेशफलक आणि पारंपरिक वाद्यांचा गजर, विद्यार्थी-विद्यार्थिनींचा उत्स्फूर्त सहभाग अशा उत्साही वातावरणात शुक्रवारी शिवाजी विद्यापीठातर्फे आयोजित ग्रंथदिंडी पार पडली. या दिंडीतून वाचनसंस्कृतीचा जागर केला.

कमला महाविद्यालय येथे सकाळी साडेआठ वाजता कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे व ताराराणी विद्यापीठाचे कार्याध्यक्ष प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील यांच्या हस्ते ग्रंथदिंडीचे उद्घाटन झाले. फुलांनी सजविलेल्या पालखीमध्ये ग्रंथांची मांडणी केली होती. 'जय जिजाऊ, जय शिवराय', 'शहीद जवान अमर रहे', अशा घोषणा देत ग्रंथदिंडी पुढे सरकत राहिली. विद्यार्थी-विद्यार्थिनींनी 'वाचन- बुद्धीचे खाद्य', 'वाचाल, तर वाचाल' अशा विविध संदेशफलकांच्या माध्यमातून वाचनसंस्कृतीचा जागर केला. विद्यार्थी, शिक्षक, अधिकारी गांधी टोप्या परिधान करून सहभागी झाले होते. दिंडीमध्ये प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, शैक्षणिक सल्लागार डॉ. डी. आर. मोरे, ग्रंथपाल नमिता खोत, डी. के. गायकवाड, ए. एम. गुरव, पी. डी. राऊत, अमित कुलकर्णी, आर. जी. कोरबू, एस. व्ही. थोरात, डी. बी. सुतार, एस. आर. लिहितकर सहभागी झाले.




ग्रंथदिंडीत संदेशफलकांच्या माध्यमातून वाचनसंस्कृतीचा जागर केला.

## पथनाट्यातून प्रबोधन

दिंडीमध्ये शहाजी कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी 'क्षयरोग - एक भयानक वास्तव', तर कमला महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींनी 'स्त्रीभ्रूण हत्या' रोखण्याबाबत प्रबोधन करणारे पथनाट्य सादर केले. राजर्षी छत्रपती शाहू कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी ढोल-ताशांचा गजर करीत चैतन्य निर्माण केले.

**महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्यादित**
(महाराष्ट्र शासनाचा उपक्रम)
म.रा.र.वि.म.
वांद्रे रिक्लमेशन बस डेपोसमोर, लिलावती रुग्णालयाजवळ, के. सी. मार्ग, वांद्रे (पश्चिम),
मुंबई-४०० ०५०. दूरध्वनी: ०२२- २६५१ ७९००
फॅक्स : ०२२-२६४१ ७८९३ वेबसाईट : www.msrdc.org, CIN : U45200MH1996SGC101586.
MAHARASHTRA SAMRUDDHI MAHAMARG

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्यादित (राज्य शासनाचा उपक्रम) यांच्या आस्थापनेवरील **'मुख्य अग्निशमन अधिकारी'** हे एक पद (अनारक्षित) शासनाच्या सा.प्र.वि.च्या शासन निर्णय दि.१७.१२.२०१६ व २१.०२.२०१८ नुसार करार पध्दतीने भरण्यासाठी अर्हता प्राप्त व अनुभवी उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. याबाबतची सविस्तर जाहिरात (पात्रताविषयक निकष, अटी व शर्ती व विहित नमुन्यातील अर्ज इत्यादी) बाबत माहिती महामंडळाच्या वर नमूद संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहे. इच्छुक उमेदवारांनी अर्ज भरण्यासाठी **www.msrdc.org** या संकेतस्थळावर **'NEWS'** **(खाली उजव्या बाजूला)** मधील संबंधित लिंकवर क्लिक करावे.

**टिप :**
१. वय, शिक्षण व अनुभव याची दि. ०१.०२.२०१९ रोजी पूर्तता होणे आवश्यक आहे.
२. या संदर्भातील अटी व शर्तीमध्ये कोणतीही दुरुस्ती /सुधारणा करण्याचे अधिकार महामंडळाने राखून ठेवले आहेत.
३. अर्ज हातबटवड्याने अथवा पोस्टाने महामंडळास सादर करण्याचा **अंतिम दि. ०९.०३.२०१९ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत राहील.**

उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक
म.रा.र.वि.म. (मर्या.)

लोकमत




आदित्य वेल्हाळ

कोल्हापुरात शुक्रवारी शिवाजी विद्यापीठाच्या ५५ व्या दीक्षांत समारंभामध्ये राज्यपाल सी. विद्यासागर राव यांच्या हस्ते अर्जुनवाडा (ता. राधानगरी) येथील सत्यजित पाटील याला राष्ट्रपती सुवर्णपदक, तर शिरोली पुलाची (ता. हातकणंगले) येथील साक्षी गावडे हिला 'कुलपती पदक' देऊन गौरविण्यात आले. यावेळी डावीकडून डी. टी. शिर्के, भीमराया मेत्री, कुलगुरु देवानंद शिंदे उपस्थित होते.

# कौशल्य, कृतिशीलतेच्या जोरावर वेगळे स्थान निर्माण करा : भीमराया मेत्री

## शिवाजी विद्यापीठ दीक्षान्त समारंभ; सत्यजित पाटील, साक्षी गावडे यांचा सन्मान

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** महाविद्यालयाच्या सुरक्षित वातावरणातून बाहेर पडून आता तुम्ही प्रत्यक्ष जगात कार्यरत होणार आहात. तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्तेच्या या जगात आपले भविष्य वेगळे असणार असून, आपल्या भूमिका निश्चिपणे बदलणार आहेत. त्यामुळे निरंतर अध्ययन, बदलते तंत्रज्ञान आणि कौशल्ये आत्मसात करून कृतिशीलतेच्या जोरावर स्वत:चे वेगळे स्थान निर्माण करा, असे आवाहन तिरुचिरापल्ली येथील भारतीय प्रबंध संस्थानचे संचालक डॉ. भीमराया मेत्री यांनी शुक्रवारी येथे नवपदवीधरांना केले.

### मेत्री यांनी सांगितली यशाची पंचसूत्री

**सर्जनशीलतेचा आग्रह धरा. मोठी स्वप्ने बघा. नावीन्य आणि सर्वोत्कृष्ट कामगिरीचा ध्यास बाळगा. नवतंत्रज्ञान आत्मसात करण्यासह भारतीय नीतिमूल्ये आणि कार्यसंस्कृती जोपासा. ही यशाची पंचसूत्री असल्याचे डॉ. मेत्री यांनी सांगितले. विद्यार्थ्यांनी आयुष्य, उद्योग-व्यवसायात नीतिमूल्यांशी कधीही तडजोड करु नये. स्वत:ला मर्यादेच्या भावनेतून बाहेर काढा. नवनिर्मिती ही गुणसूत्रांतच असायला हवी. शिवाजी विद्यापीठ बदलत्या काळानुसार वाटचाल करीत आहे. या विद्यापीठाचा माजी विद्यार्थी असल्याचा मला अभिमान आहे.**

**दीक्षान्त समारंभास गर्दी कमी उत्साह मोठा ◆ उत्साहात निघाली ग्रंथदिंडी -वृत्त/५**

शिवाजी विद्यापीठाच्या ५५ व्या दीक्षांत समारंभामध्ये प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. लोककला केंद्रातील या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राज्यपाल सी. विद्यासागर राव होते. त्यांच्या हस्ते अर्जुनवाडा (ता. राधानगरी) येथील (पान ५ वर)

# Take risks and never give up, SUK graduates exhorted

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** Better performance comes from best practice benchmarking. Once you start benchmarking, the next step is to aim to be the global leader, said Bhimaraya Metri, director of IIM-Tiruchirappalli and an alumnus of the Shivaji University, Kolhapur (SUK).

He was speaking at the 55th convocation ceremony of the university on its campus on Friday.

Metri said, "Shivaji university is the only university in the state which has the distinction of having produced a director of the prestigious IIM. I am fortunate enough to have graduated 30 years ago from this university and I am grateful to my alma mater for having enabled me to achieve this distinction."

Addressing the students, he said, "I want you to remember that performance leads to recognition. Recognition leads to respect. Respect leads to power. Therefore, my friends, there is only one way to make your university and nation proud and that is through execution or performance. This can only be achieved by making excellence as a habit in our day-to-day life. The life is not about finding yourself; life is about creating yourself. There are no limit to what you can accomplish, the limitation exists only in your mind. Your life is the result of choices you make."

He further said, "Whatever the business or rile you enter in the corporate world, you have to have laser focus. No back up plan. The minute you have back up plan, you have admitted that you are not going to succeed. At the same time, do not get fear of failure. I believe that in order to be successful, you must take risks. So never give up."

He shared five mantras with the graduating students of daring to be different, dreaming big, introspection and innovation, adoption of technology, and practising Indian ethos for leading a successful life.

Vice-chancellor Devanand Shinde in his speech said that the university has recently received grant of Rs 1.2 crore for the centre for nano fabrics and centre for VLSI under the Rashtriya Uchhtar Shiksha Abhiyan. The varsity's different departments have applied for ISO ranking and National Board of Accreditation (NBA) certification is also in the pipeline.

Governor and chancellor C Vidyasagar Rao and other dignitaries from the SUK were present on the occasion.

Rahul Gayakwad



Students after the 55th convocation ceremony held on the SUK campus on Friday

# Convocation turns lacklustre due to change in norms

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** The in-house students of SUK celebrated the convocation ceremony with selfies and group photos amid a lot of fun, while the students who passed out from affiliated colleges are waiting for their turn to celebrate the same in the 'graduation ceremony' at their respective colleges.

Officials said around 2,700 students of the department of technology, centre for distance education of SUK, and the in-house departments of physics, mathematics, biology and humanities of the SUK, among others, were distributed their degree certificates on Friday.

Amol Patil, a student, said he accompanied his friend for the ceremony and clicked photos on the university campus, but he is waiting for his turn, as the notification regarding his college's graduation ceremony is yet to be released.

Due to the recent changes in the convocation ceremony under the Maharashtra Universities Act, 2016, the affiliated colleges of the SUK have been asked to conduct separate ceremonies to distribute the certificates. Due to this, the routine crowd and colours on the campus for the ceremony were missing on Friday.

The freelance photographers who used to have a field day during the convocation event expressed their disappointment.

"There were very few students and almost everyone carries smart phone. So, very few opted to engage us. Earlier, at least students from the remote and rural areas used to line up for photos," said a photographer.

# हुसेनसागर तलावाच्या धर्तीवर रंकाळा तलावाचा विकास शक्य

प्रतिनिधी
कोल्हापूर

ऐतिहासिक रंकाळा तलावास राज्यपाल सी. विद्यासागर राव यांनी शुक्रवारी भेट देऊन तलावाची पाहणी केली. यावेळी त्यांच्या पत्नी विनोधा रावही उपस्थित होत्या. यावेळी त्यांनी हैदराबाद येथील हुसेनसागर तलावाच्या धर्तीवर कोल्हापूरच्या ऐतिहासिक वैभव असलेल्या रंकाळा तलावाचा विकास करणे शक्य असल्याचे प्रतिपादन केले.

राज्यपाल सी. विद्यासागर राव यांनी रंकाळा टॉवर येथून संपूर्ण रंकाळयाची पाहणी केली. यावेळी उपस्थितांकडून रंकाळा तलाव संवर्धन आणि सौंदर्यीकरणासाठी विशेषबाब म्हणून १५ कोटींची मागणी करण्यात आली. याबाबत त्यांनी सकारात्मक प्रतिसाद देत जिल्हाधिकारी दौलत देसाई यांच्याशी चर्चाही केली. रंकाळयावरील संध्यामठ, शालीनी पॅलेस, विस्तीर्ण पाणी, मनोरे यांचीही माहिती घेतली.

यावेळी महापौर सरीता मोरे, जिल्हाधिकारी दौलत देसाई, मुख्य कार्यकारी अधिकारी अमन मित्तल, पोलीस अधीक्षक डॉ.अभिनव देशमुख, महापालिका अतिरिक्त आयुक्त श्रीधर पाटणकर, पोलीस



उपअधीक्षक डॉ. प्रशांत अमृतकर, निवासी उपजिल्हाधिकारी संजय शिंदे, सहाय्यक आयुक्त मंगेश शिंदे, शहर अभियंता नेत्रदिप सरनोबत, आरोग्य अधिकारी डॉ. दिलिप पाटील, तहसिलदार सचिन गिरी, सहाय्यक जिल्हा पुरवठा अधिकारी अपर्णा मोरे, गटविकास अधिकारी सचिन घाडगे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

**राज्यपाल सी.विद्यासागर राव यांनी घेतले अंबाबाईचे सपत्नीक दर्शन**

राज्यपाल सी. विद्यासागर राव यांनी शुक्रवारी सकाळी दहा वाजता करवीर निवासिनी अंबाबाईचे सपत्नीक दर्शन घेतले. राज्यपाल सी. विद्यासागर राव, विनोधा राव यांनी मंदिर शिखरातील मातृलिंगाचेही दर्शन घेतले.

तरुण भारत    शनिवार, २३ फेब्रुवारी २०१९

# रोबोयुगाला सामोरे जाण्याची तयारी ठेवा

पान १ वरून

कुलपती तथा राज्यपाल चे. विद्यासागर राव हे अध्यक्षस्थानी होते.

कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी वार्षिक अहवाल वाचन केले. राज्यपाल विद्यासागर राव यांच्या हस्ते सत्यजित पाटील यांना राष्ट्रपती सुवर्ण पदक तर साक्षी गावडे यांना कुलपती सुवर्णपदक प्रदान करण्यात आले. पीएच.डी. धारक ३९ स्नातक, गुणवंत विद्यार्थ्यांना १७ पारितोषिके मान्यवरांच्या हस्ते व्यासपीठावर प्रदान करण्यात आली. ४८ हजार ५१५ विद्यार्थ्यांपैकी २ हजार ५०० विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष पदवी प्रमाणपत्रे घेतली. २२४ महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांची पदवी प्रमाणपत्रे वितरण करण्यात आली.

भारतीय प्रबंध संस्थानचे संचालक भिमराया मेत्री म्हणाले, भारत जागतिक महासत्ता बनण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे. जगातील पहिल्या तीन देशांच्या अर्थव्यवस्थेपैकी एक अर्थव्यवस्था म्हणून स्थापित होण्याचे भारताचे प्रयत्न आहेत. तरुणांचा देश म्हणून भारताची ओळख आहे. त्यामुळे जागतिकीकरणात आपले स्थान निर्माण करण्याची भारतीय तरुणांना संधी आहे. कॉलेज जगतातून बाहेर पडत असताना विद्यार्थ्यांना अनेक रोजगाराच्या संधी मिळतील. त्यावेळी विद्यार्थ्यांना आपली दिशा ठरविता आली पाहिजे. नवकौशल्य, कृतीशीलतेचा वापर करून दिशा ठरवा, असा सल्ला मेत्री यांनी दिला.

नवनवीन तंत्रज्ञानामुळे दररोज वेगवेगळे शोध लागत आहेत. त्यातील प्रत्येक गोष्ट मानवी जीवनाच्या जवळ येत आहे. प्रभाव टाकत आहे. रोबो टेक्नॉलॉजीसारख्या अतिप्रगत तंत्रज्ञानाने तर भविष्यात मानवी जीवनावर मोठा प्रभाव पडणार आहे. भविष्यात रोबो मानवाला कंट्रोल करतील. जगभरात ३० लाख हून अधिक रोजगार रोबोबॉसव्दारे व स्मार्ट रोबोटव्दारे नियंत्रित केले जात आहेत. डीलॉटच्या अहवालानुसार मानवाच्या वर्तनातील ६५ प्रकारचे वर्तन रोबोमध्ये अंतर्भूत करण्यात आली आहे. रोबो टेक्नॉलॉजीचा परिणाम मानवीजीवनाबरोबर युवावर्गावरही होणार आहे. त्यातून निर्माण होणारी आव्हाने वेगळी असतील. त्यांना सामोरे जायचे असेल तर निरंतन अध्ययन, कौशल्याचा पुनर्विकास केला पाहिजे. व्यवसायिक दृष्टीकोन ठेवून नाविन्य निर्माण केले तरच कार्पोरेट युगात यशस्वी व्हाल. यशासाठी कोणताही बॅकअप प्लॅन करू नका. तसेच अपयशाला घाबरून धोका पत्करणे टाळू नका, असा सल्लाही मेत्री यांनी दिला.

दीक्षांत सोहळ्यात डॉ. ए. एम. गुरव, डॉ. पी. डी. राऊत, डॉ. भारती पाटील, डॉ. पी. एस. पाटील यांनी स्नातकांना सादर केले. प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली. जनसंपर्क अधिकारी अलोक जत्राटकर आणि यांनी सूत्रसंचालन केले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी आभार मानले. परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे यांनी सर्व विभागात किती स्नातकांना व्यासपीठावर पदव्या प्रदान करण्यात येणार आहेत, याची माहिती दिली.

यावेळी श्रीमंत छत्रपती शाहू महाराज, ज्येष्ठ विचारवंत डॉ. एन. डी. पाटील, वित्त व लेखा अधिकारी व्ही. टी. पाटील, शैक्षणिक सल्लागार डॉ. डी. आर. मोरे, व्यवस्थापन परिषद सदस्य अमित कुलकर्णी, बाबा सावंत आदी उपस्थित होते.

### अपयशातून यशाचा मार्ग

मेत्री यांनी यावेळी आपल्या करिअरचा ग्राफ उपस्थितांपुढे मांडला. ते म्हणाले, मी माझ्या आयुष्यात करिअरच्या शिड्या झटापट चढलो. या गोष्टीचे श्रेय अपयशांना जाते. म्हणून अपयशाने कधी खचून जावू नका. जागतिक मंदीच्या काळात अनेक परदेशी कंपन्या रसातळाला गेल्या आहेत; पण भारतीय कंपन्यांनी प्रगती करून कर्मचाऱ्यांना वेतनवाढही दिली. याचे श्रेय औद्योगिक कार्यपध्दतीला जाते. आयुष्यात यशस्वी व्हायचे असेल तर भारतीय नीतीमूल्ये कधी सोडू नका. डीजिटल युगातील तुम्ही जन्माला आल्याने तुम्ही डीजीटल युगातील ज्ञानयुगाचे वारकरी आहात. म्हणून विद्यार्थ्यांनी सृजनशीलता आणि नवतंत्रज्ञानाचा अंगिकार करून चांगल्या अर्थाने विध्वंसक बनले पाहिजे, असा सल्लाही मेत्री यांनी विद्यार्थ्यांना दिला.

### सच्चा नेता बनण्यासाठी सर्वोत्कृष्टतेची गरज

विद्यार्थ्यांनी आपल्या विद्यापीठाचे, देशाचे नाव उज्वल करण्यासाठी सर्वोत्कृष्ट कामगिरी केली पाहिजे. जीवन हा स्वत:चा शोध नव्हे तर स्वत:ला घडवण्याची कार्यशाळा आहे. कोणत्याही ध्येयसक्तीला मर्यादा नसताना आपण आपल्या मनाला मर्यादा घालतो. ज्याचा कोणी विचार करीत नाही, त्याचा तुम्ही विचार करून त्या गोष्टी पूर्णत्वास नेतो तो खरा नेता असतो. म्हणून सर्वोत्कृष्ट गोष्टी निर्माण करा, असेही मेत्री यांनी सांगितले.

# रोबोयुगाला सामोरे जाण्याची तयारी ठेवा

## भारतीय प्रबंध संस्थानचे संचालक भीमराया मेत्री यांचे आवाहन : शिवाजी विद्यापीठाचा दीक्षांत सोहळा उत्साहात

प्रतिनिधी
कोल्हापूर

बदलणारे जग आणि विकासाच्या प्रक्रियेत मानवी जीवनावर तंत्रज्ञानाचा प्रभाव वाढत आहे. रोबो (यंत्रमानव) टेक्नॉलॉजीसारखे अत्याधुनिक तंत्रज्ञान मानवी जीवनाचा अविभाज्य भाग बनू पाहत आहे. भविष्यात तंत्रज्ञानच मानवाला कंट्रोल करणार आहे. त्यातून युवा वर्गाचे भविष्यही बदलणार आहे. नव्या जगातील निर्माण होणारी आव्हाने वेगळी असतील. त्यांना सामोरे जाण्यासाठी नवतंत्रज्ञानाचा स्वीकार करण्याशिवाय पर्याय नाही, असे प्रतिपादन तिरूचिरापल्ली येथील भारतीय प्रबंध संस्थानचे (आयआयएम : इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट) संचालक भिमराया मेत्री यांनी केले. नव्या जगाला सामोरे जाताना आपल्या भारतीय संस्कृतीतील मूल्ये जपा. सृजनशीलता, नाविन्य , मोठी स्वप्ने, आत्मपरीक्षण व सर्वोत्कृष्टतेचा ध्यास ही पंचसूत्री आत्मसात करा, असा सल्लाही त्यांनी दिला.




कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील ५५ व्या दीक्षांत समारंभात मार्गदर्शन करताना भिमराया मेत्री. सोबत कुलपती तथा राज्यपाल चे. विद्यासागर राव, कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, डॉ. ए. एम. गुरव, डॉ. पी. डी. राऊत.

शिवाजी विद्यापीठाचा ५५ वा दीक्षांत समारंभ शुक्रवारी हजारो विद्यार्थी-विद्यार्थिनींच्या उपस्थित झाला. विद्यापीठाच्या दीक्षांत सभागृहात झालेल्या या समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून मेत्री यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

पान ६ पहा





कोल्हापूर : दीक्षांत समारंभामध्ये उपस्थित असलेले श्रीमंत छत्रपती शाहू महाराज, जि. प. मुख्य कार्यकारी अधिकारी अमन मित्तल, जिल्हाधिकारी दौलत देसाई, ज्येष्ठ समाजसेवक प्रा. एन. डी. पाटील आदी मान्यवर. दुसऱ्या छायाचित्रात पदवी प्रमाणपत्र घेण्यासाठी विद्यार्थ्यांनी केलेले गर्दी. (सर्व छाया : पांडुरंग पाटील)

# उत्सुकता अन् उत्साह

**(पान १ वरुन)** पदवी प्रमाणपत्र हाती मिळताच बहुतेक तरुण-तरुणींनी मुख्य इमारतीसमोरील बागेमध्ये गर्दी करण्यास सुरुवात केली. पदवी प्रमाणपत्र हातामध्ये घेऊन फोटो काढण्याची जणू स्पर्धाच तेथे लागली होती. सेल्फीबरोबरच ग्रुप फोटो घेण्याचाही अनेकांचा कल होता. छत्रपती शिवरायांच्या पुतळ्याच्या साक्षीने संपूर्ण आयुष्यभर लक्षात राहील असा फोटो काढण्याचा अनेकांचा मनोदय होता. त्या प्रमाणे आपल्या मित्र-मैत्रिणीबरोबर फोटो काढण्यात आले. विद्यापीठातर्फे ग्रंथमहोत्सवाचे अयोजनही करण्यात आले आहे, त्या ठिकाणीही तरुणाई गर्दी करत होती; तर विद्यार्थ्यांच्या काही ग्रुपसनी येथे खाद्यपदार्थांचे स्टॉल्स लावले आहेत, त्यामुळे विद्यार्थ्यांच्या या स्टॉलवरही इतर विद्यर्थी थांबून त्यांनी बनवलेल्या पदार्थांचा आस्वाद घेत होते.

शुक्रवारी दुपारी उन्हाचा पारा वाढत होता, तरी तरुणाईचा उत्साह काही कमी होत नव्हता. पदवीनंतर अनेकांनी पदव्युत्तर शिक्षणासाठी विद्यापीठामध्ये प्रवेश घेतला, अशा विद्यार्थ्यांकडूनही पदवी मिळाल्याचा आनंद साजरा करण्यात आला, तर ज्यांना व्यासपीठावर पदवी प्रमाणपत्र देण्यात आले, ते या सोहळ्यासाठी मित्रमंडळी तसेच कुटुंबीयांसोबत दाखल झाले होते. त्यांनी कार्यक्रम संपताच सभागृहातच फोटो व सेल्फी घेण्यास सुरुवात केली.

**मान्यवरांची उपस्थिती :** सर्व मान्यवरांचे पयासदानाच्या साथीने दीक्षांत मिरवणुकीने कार्यक्रमस्थळी आगमन झाले. ज्ञानदंड हाती घेऊन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे यांनी दीक्षांत मिरवणुकीचे नेतृत्व केले. श्रीमंत शाहू महाराज, प्रा. एन. डी. पाटील, उर्वरित विकास महामंडळाचे डॉ. योगेश जाधव, जिल्हाधिकारी दौलत देसाई, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अमन मित्तल यांच्यासह व्यवस्थापन समितीचे सदस्य, सिनेट सदस्य, कर्मचारीवर्ग आणि विद्यार्थी उपस्थित होते.

## पत्रकारिता अध्यासन केंद्राची पायाभरणी

विद्यापीठाच्या परिसरात पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासन केंद्र इमारतीच्या पायाभरणीचा समारंभ महाराष्ट्राचे राज्यपाल सी. विद्यासागर राव यांच्या हस्ते झाला. पहिल्या टप्प्यातील दीड कोटीच्या कामांचा शुभारंभही राज्यपाल सी. विद्यासागर राव यांच्या हस्ते करण्यात आला. अध्यासन केंद्र इमारतीची कोनशिला अनावरण व पायाभरणी समारंभास पालकमंत्री चंद्रकांत पाटील, कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, ज्येष्ठ पत्रकार डॉ. प्रतापसिंह जाधव, उर्वरित महाराष्ट्र विकास मंडळाचे अध्यक्ष डॉ. योगेश जाधव, जिल्हाधिकारी दौलत देसाई, मुख्य कार्यकारी अधिकारी अमन मित्तल, पोलीस अधीक्षक डॉ. अभिनव देशमुख, प्र. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, डॉ. निशा मुडे-पवार, रत्नाकर पंडित आदी उपस्थित होते.



कोल्हापूर : दीक्षांत मिरवणुकीत ज्ञानदंड घेऊन सहभागी झालेले परीक्षा व मूल्यमापनचे संचालक डॉ. महेश काकडे.

## मोठी स्वप्ने पाहा; सृजनशील बना

**(पान १ वरून)** कुलगुरू डॉ. शिंदे यांच्या हस्ते कुलपती सी. विद्यासागर राव आणि प्रमुख पाहुणे डॉ. भीमराया मेत्री यांचे ग्रंथभेट, शाल व स्मृतिचिन्ह देऊन स्वागत करण्यात आले. प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला. परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे यांनी पदवी, पदविका व प्रमाणपत्रांच्या यादीचे वाचन केले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी आभार मानले. आलोक जत्राटकर, धैर्यशील यादव व जयश्री देसाई यांनी सूत्रसंचालन केले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली. दरम्यान, दीक्षांत समारंभात सत्यजित संजय पाटील या विद्यार्थ्यास सर्वसाधारण कौशल्यासाठीचे राष्ट्रपती पदक, तर साक्षी शिवाजी गावडे हिला कला शाखेत सर्वाधिक गुण प्राप्त केल्याबद्दल कुलपती सुवर्णपदक कुलपती सी. विद्यासागर राव यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. यावेळी ४० पीएच.डी. स्नातकांना पदवी प्रदान करण्यात आल्या. त्याचप्रमाणे १६ विविध पारितोषिकांचे वितरण करण्यात आले.

# शिवाजी विद्यापीठाचा ५५ वा दीक्षान्त सोहळा





कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या ५५ व्या दीक्षान्त समारंभात सर्वसाधारण कौशल्यासाठीचे राष्ट्रपतीपदक सत्यजित पाटील या विद्यार्थ्यास कुलपती तथा राज्यपाल सी. विद्यासागर राव यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. यावेळी तिरुचिरापल्ली येथील आयआयएमचे संचालक डॉ. भीमराया मेत्री, कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे आदी मान्यवर उपस्थित होते. तर दुसऱ्या छायाचित्रामध्ये कला शाखेत सर्वाधिक गुण प्राप्त केल्याबद्दल कुलपती सुवर्णपदक साक्षी गावडे या विद्यार्थिनीस प्रदान करण्यात आले. (वृत्त स्मार्ट कोल्हापूर) (छाया : पांडुरंग पाटील)




कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचा ५५ वा दीक्षांत समारंभ उत्साहात झाला. यावेळी विद्यार्थ्यांनी मुख्य इमारतीसमोरच्या बागेमध्ये आपला आनंद व्यक्त केला. (सर्व छाया : पांडुरंग पाटील)

# उत्सुकता अन् उत्साह

## शिवाजी विद्यापीठाच्या ५५ वा दीक्षांत समारंभाला उत्स्फूर्त गर्दी

कोल्हापूर / प्रतिनिधी :

**सळसळते तारुण्य... मनामध्ये उज्ज्वल भविष्याचा ध्यास... महाविद्यालयातील शिक्षण संपल्यानंतर बऱ्याच दिवसांनी भेटलेल्या मित्र-मैत्रिणींची साथ... आणि हाती मिळालेल्या पदवीचा आनंद घेऊन तरुणाई शिवाजी विद्यापीठाच्या ५५ व्या दीक्षांत समारंभासाठी दाखल झाली. तरुणाईच्या या उत्साहामुळे विद्यापीठातील वातावरण भारून गेले होते.**

पदवीचे शिक्षण पूर्ण झालेल्या प्रत्येक विद्यार्थ्यास विद्यापीठाच्या दीक्षांत सोहळ्याची आस लागलेली असते. अनेक विद्यार्थी-विद्यार्थिनी या सोहळ्याची प्रतीक्षा करीत असतात. शुक्रवारी सकाळपासूनच तरुणाई विद्यापीठाच्या आवारात दाखल होत होती. अनेक ग्रुप्सनी आपली भेटण्याची जागा आधीच ठरवून ठेवली होती. त्या प्रमाणे तेथे सर्वजण जमा झाले. विद्यापीठातर्फे परीक्षा विभागाच्या बाहेरील परिसरात स्टॉल लावून विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्र देण्याची व्यवस्था केली होती. सकाळच्या सत्रामध्ये विद्यार्थ्यांची तेथे गर्दी होती.

▶▶ पान २ वर

### सेल्फीसाठी गर्दी

हिरवागार परिसर, दीक्षांत सोहळ्याच्या निमित्ताने खुली करण्यात आलेली मुख्य इमारतीसमोरील बाग, यामुळे अनेकांना सेल्फी घेण्याचा मोह आवरता आला नाही. छत्रपती शिवरायांच्या पुतळ्या शेजारचा परिसर हा फोटो, सेल्फी पॉईंट बनला होता. याठिकाणी फोटो काढण्यासाठी तरुण-तरुणींनी गर्दी केली होती.



# मोठी स्वप्ने पाहा; सृजनशील बना

## - डॉ. भीमराया मेत्री



कोल्हापूर / प्रतिनिधी :

मोठी स्वप्ने पाहा, सृजनशील बना, सातत्याने आत्मपरीक्षण करा तसेच नवता व सर्वोत्कृष्टतेचा ध्यास धरा, नवतंत्रज्ञान आत्मसात करा आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे भारतीय मूल्यसंस्कृती प्राणपणाने जोपासा, अशी यशाची पंचसूत्री तिरुचिरापल्ली येथील आय. आय. एम.चे संचालक डॉ. भीमराया मेत्री यांनी शिवाजी विद्यापीठाच्या स्नातकांना दिली. शिवाजी विद्यापीठाचा ५५ वा दीक्षांत समारंभ विद्यापीठाच्या लोककला केंद्रात शुक्रवारी दुपारी झाला. या समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. मेत्री बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्राचे राज्यपाल तथा शिवाजी विद्यापीठाचे कुलपती सी. विद्यासागर राव होते.

डॉ. मेत्री म्हणाले, विद्यार्थ्यांनी आयुष्यात असो किंवा उद्योग-व्यवसायात; नीतिमूल्यांशी कधीही तडजोड करू नये. सन २००८च्या जागतिक मंदीच्या कालखंडामध्ये अमेरिका-युरोपातील कंपन्या बंद पडत असतानाच, भारतीय कंपन्या आगेकूच करीत आपल्या कर्मचाऱ्यांना उत्तम वेतनवृद्धीही देत होत्या. लॅपटॉप, स्मार्टफोन, समाजमाध्यमे अशा वैविध्यपूर्ण बाबींनी सजलेल्या डिजिटल युगातील आपण सारे विद्यार्थी ज्ञानयुगाचे वारकरी आहात. सध्या भारत जागतिक स्तरावर गतीने वाढणारी अर्थव्यवस्था आहे. जगातल्या आघाडीच्या तीन देशांपैकी एक होण्याच्या दिशेने आपली वाटचाल सुरू आहे. जगातील सर्वाधिक तरुण महासत्ता असलेल्या येथील प्रत्येक युवकाला जागतिक स्तरावर संधींची द्वारे खुली आहेत.

उपस्थित स्नातकांबरोबरच अनुपस्थित स्नातकांवरही कुलपती यांनी पदवी प्रदान करून अनुग्रह केला. यावेळी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी शिवाजी विद्यापीठाचा वार्षिक अहवाल सादर केला.

▶▶ पान २ वर



**कुलपती सी. विद्यासागर राव यांनी स्नातकांना उपदेश केला. ते म्हणाले, नवस्नातक पदवी, पदविका, प्रमाणपत्रे घेऊन नव्या युगात प्रवेश करीत असताना आपली वाणी आणि कृती या दोहोंच्या संदर्भाने आपण आपली पात्रता सिद्ध करावी.**



कोल्हापूर : दीक्षांत समारंभानिमित्त ग्रंथदिंडी काढण्यात आली. यावेळी उपस्थित कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर, डॉ. डी. आर. मोरे आदी.

### ग्रंथदिंडी उत्साहात

सकाळच्या सत्रात कमला महाविद्यालय येथून विद्यापीठ लोककला केंद्रापर्यंत ग्रंथदिंडी काढण्यात आली. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते ग्रंथपूजनाने ग्रंथदिंडीचे उद्घाटन झाले. झांजपथकाच्या तालावर शहरातून ग्रंथदिंडी काढण्यात आली. दिंडीचे विद्यापीठात आगमन झाल्यानंतर स्वयंसेवकांनी प्रबोधनपर पथनाट्य सादर केले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे, शैक्षणिक सल्लागार डॉ. डी. आर. मोरे, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, विद्यापीठ ज्ञानस्रोत केंद्राच्या संचालक डॉ. नमिता खोत, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, राष्ट्रीय सेवा योजनेचे समन्वयक डॉ. डी. के. गायकवाड, प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील यांच्यासह शिक्षक, ग्रंथालयातील अधिकारी, प्रशासकीय सेवक, राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.




कोल्हापूर : दीक्षांत समारंभामध्ये विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना राज्यपाल सी. विद्यासागर राव. सोबत डॉ. भीमराया मेत्री, कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आदी मान्यवर.